संस्थापकः राजन राजे

KRISHANARPANMASTU

# कृष्णार्पणमस्तु

संपादकः महेशसिंग ठाकूर

RNI: MAHMAR/2023/88105

Volume : 4 | Issue : 4 | Marathi Monthly | Thane, 1 October 2026 to 31 October 2026 | Pages 16 | Price : 10/-

## ॲप्कोटेक्स’, प्रोटेगो इंडिया, हिवा इंडिया, डीआरटी-ॲंथिया, सिंप्रेससारख्या अनेक राष्ट्रीय-बहुराष्ट्रीय कंपन्यांपाठोपाठ...

# ‘वॉलमेट’ (डोंबिवली, अंबरनाथ) या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये... भव्य पगार / बोनस वाढीच्या त्रैवार्षिक कराराची, ‘राजन राजे’ व ‘धर्मराज्य’तर्फे फटाक्यांची सलग दुसरी आतषबाजी...!!!



रशिया-युक्रेन व अमेरिका-इस्रायल-इराण दरम्यान सुरु असलेल्या युद्धांच्या प्रतिकूल जागतिक परिस्थितीत...‘धर्मराज्य पक्ष’प्रणित ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चा समस्त कामगारविश्वात सनसनाटी व थरार पैदा करणारा करार...वॉलमेट-कंपनीमधील कामगारांमध्ये आनंद-उत्साहाला एकच उधाण!

‘‘घन तमीं शुक्र बघ राज्य करी...रे खिन्न श्रमिक-मना, बघ जरा तरी...का गुदमरशी आतच कुढुनी? रे मार भरारी ‘वॉलमेट-कामगारा’परी...!!!’’

सुमारे सहा वर्षांपूर्वी ३० वर्षांची वैयक्तिक मालकीची असलेली ही कंपनी, ‘वॉलमेट’ (Valmet) या बहुराष्ट्रीय कंपनीकडे हस्तांतरित झाल्यानंतर, कंपनीतील सुमारे दिडशे कामगारांनी ‘राजन राजे’ यांच्या नेतृत्त्वाखालील ‘धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा’चं सदस्यत्व पत्करलं. गेली कित्येक वर्षे तुटपुंज्या वेतनावर काम करणाऱ्या, या कामगारांना संघटनेच्या माध्यमातून पहिल्याच त्रैवार्षिक-करारात १५,०००/- (रु. पंधरा हजार) ची वेतनवाढ; तर, आता झालेल्या दुसऱ्या त्रैवार्षिक-करारात २१,००० (रु. एकवीस हजार) ची वेतनवाढ मिळाली आहे.

वॉलमेट-कंपनीमध्ये केमिकल, खत व अभियांत्रिकी उद्योगांसाठी बॉल-व्हॉल्व्ह, ॲक्च्युएटर, पोझिशनर व लिमिट स्विचसह विविध उच्चदर्जाच्या ‘व्हॉल्व्ह ऑटोमेशन उपकरणां’ची निर्मिती केली जाते... ‘‘कामगारांनी आता, व्यवस्थापनाला ‘सिम सिम खुल जा’ असं म्हणत, मनमोकळेपणाने सकारात्मक प्रतिसाद व दिलखुलास सहकार्य द्यावं; म्हणजे कंपनीसह ...पृष्ठ क्र. ३ वर

‘सुल्झर’च्या कामगारांची गणेशोत्सवाआधी दिवाळी या मथळ्याखाली आलेल्या बातमीच्या अनुषंगाने...

## सुल्झर-पंप्स् कंपनीच्या तथाकथित बोनस-घबाडाची वृत्तपत्रीय बातमी आणि त्याची ‘‘दूध का दूध और पानी का पानी’’ अशी त्याची ‘पोलखोल’..ही, समस्त कामगार-कर्मचारीवर्गासाठी ‘‘डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा एक धडा!’’

...‘राजन राजे’ यांच्या नेतृत्त्वाखालील मूळ ‘सेऊ’ कामगार-संघटनेच्या, कित्येक वर्ष जुन्या व आजही चालत आलेल्या, पूर्वीच्या करारांतील...घालून दिलेल्या ‘बोनस-प्रथे’प्रमाणेच, हा बोनस आहे; त्यात इतर कुणाचं काही योगदान असण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

वर्ष-२०१९ पासून गेली सातेक वर्षे, सुल्झरमध्ये नव्या कामगारविरोधी व्यवस्थापनाच्या ‘अनुचित कामगार प्रथांविरोधा’त (ULPs) मूळ सेऊ संघटनेचा तीव्र न्यायालयीन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, ही बोनस-रक्कम विशिष्ट व्यवस्थापनधार्जिण्या...पृष्ठ क्र. २ वर

अंतरंग



पत्रकारिकेत अभिजात मराठीचा दुष्काळ

- जगदीश काबरे
पृष्ठ क्र. ४



हे गणराया, गणनायका, बुद्धीदात्या, बुद्धीच्या देवता....

...राजन राजे
पृष्ठ क्र. ५




‘गुंज’ ते नव्या मन्वंतराची चाहूल : राहुल गांधींच्या राजकारणाने काँग्रेसमध्ये आलेले नवे चैतन्य

- सुजय शास्त्री
पृष्ठ क्र. १३




मार्क्सच्या जीवनातील चार महत्त्वाची वर्षं

- प्रा. डॉ. अविनाश कोल्हे
पृष्ठ क्र. १५

## ‘सुल्झर’च्या कामगारांची गणेशोत्सवाआधी दिवाळी या मथळ्याखाली आलेल्या बातमीच्या अनुषंगाने... ...पृष्ठ क्र. १ वरुन




गटालाच केवळ अनुचितपणे दिली जातेय, हे ध्यानात घेणं आवश्यक आहे. आमच्या बहुसंख्य सभासदांना, गेली साधारण सात वर्षे, बोनस किंवा पगारवाढ ‘न’ मिळूनही... ते आमच्यासोबत ‘संघर्षरत’ आहेत; ही कामगारक्षेत्रातल्या ‘कामगारधर्मा’साठी क्रांतिकारक बाब आहे! वरील सुल्झर बोनस-बातमी संदर्भात; कामगारविश्वासाठी, कामगारक्षेत्रातील तज्ज्ञांसाठी व अभ्यासकांसाठी पुढील बाबी महत्त्वपूर्ण आहेत...

१) ‘राजन राजे’ यांच्या नेतृत्त्वाखालील मूळ ‘सेऊ’ कामगार-संघटनेनं, साधारण ९-१० वर्षांपूर्वीच, अडीच लाखांचा आजवरचा सर्वोच्च बोनस दिला होता...‘सहा आकडी’ म्हणजे लाखाची ‘बोनस-परंपरा’ वर्ष-२००७ मध्ये सुरु झाली.

२) पूर्वी बोनस-लाभार्थ्यांची संख्या या फुटीर-गटाच्या बोनस-लाभार्थ्यांच्या संख्येच्या अंदाजे तिपटी-चौपटीहून अधिक असायची.

३) **आजमितीस मूळ सेऊ संघटनेच्या कामगार-कर्मचारीवर्गाला हा बोनस, अन्यायरित्या व बेकायदेशीररित्या मुजोर व्यवस्थापन देत नसल्याने व कंपनीत मोठ्याप्रमाणावर ‘कंत्राटी-कामगार’ असल्याने...नेमक्या कुठल्या वेतनश्रेणीतील किती ‘कायम’ कामगारांना, खरंच या अडीच लाख रु. बोनसचं वाटप झालंय, हे तपासून घेणं आवश्यक आहे; मोठी शक्यता ही आहे की, तो आकडा निम्म्याहून कमी, म्हणजेच धादांत ‘फसवा’ असावा!**

४) आपल्या बोनसचा वाटा केवळ कायम कामगार-कर्मचारीवर्गालाच नव्हे; तर, शॉपफ्लोअरवर कुठल्या न् कुठल्या स्वरुपात अतिरिक्त वा प्रासंगिक काम करणाऱ्या...शेकडो कँटीन-कर्मचाऱ्यांना, सुरक्षारक्षकांना, कित्येक कॅज्युअल-कामगारांना मिळत होता. ‘समृद्धी सर्वांची’ (Common OR Shared Prosperity) या ‘समाजवादी-तत्त्वा’नुसारच तो दिला जायचा...आता, गेली सातेक वर्ष, या सगळ्याला पूर्ण फाटा देऊन बोनस-लाभार्थ्यांची संख्या कमालीची घटवली गेलीय; उदा.

अ) अनेकांना हिशोबाचा ‘नारळ’ दिला गेलाय.

ब) अनेकजण निवृत्त झालेत आणि त्यांच्या जागी ‘कायम’ऐवजी थेट ‘कंत्राटी-गुलामां’ची (कामगार, कर्मचारी, सुपरवायझर्स इ. सुद्धा) कंपनीत मोठ्याप्रमाणावर भरती वेळोवेळी केली गेलीय.

क) **कंपनीतील ‘कायम’ कामगार वा कर्मचारी असलेली, अकाऊंट्स सारखी विशिष्ट खाती, ‘Outsourcing’ करण्याची व्यवस्थापकीय-चलाखी केली गेलीय...अशातऱ्हेनं, बोनसवाटप भागाकाराच्या गणिताचं उत्तर, स्वाभाविकच, ‘भाजक (Denominator) मोठ्याप्रमाणावर घटल्याने वा घटवला गेल्याने, आताच्या घडीला...याहूनही खूपच मोठं यायला हवं होतं. मात्र, प्रत्यक्षात, परिस्थिती पूर्णतः विरोधाभास दाखवते!**

५) आमची मूळ ‘सेऊ’ (SEU...Sulzer Pumps India Employees' Union) ही कंपनीअंतर्गत कामगार-संघटना अथवा युनियन संपवण्यासाठी, अनेकोनेक ‘अनुचित कामगार-प्रथा’ (ULPs... Unfair Labour Practices) राबवून आजवर आमच्या अंदाजे ४० हून अधिक सभासद-कामगारांना खोटे आरोप लावून व महिनोनमहिने कंपनी-अंतर्गत चौकशांचं लचांड लावून, एक किंवा एकापेक्षा अधिकवेळा ‘निलंबित’ केलं गेलंय; तर, चारपाच जणांना कामावरुन काढून टाकलं गेलं आहे, ते वेगळंच.

६) लक्षात घ्या, नव्या ‘सुल्झर पंप्स इंडिया’ व्यवस्थापनाने आल्यानंतर लागलीच, बेकायदेशीररित्या अंदाजे एक तासाहून अधिक कामाची वेळ वाढवलेली आहे...हे ही यासंदर्भात ध्यानात घेणं, गरजेचं आहे (त्याबाबत, आम्ही न्यायालयीन दाद मागितली असल्यानेच, तूर्तास त्यावर अधिक भाष्य नको)!

बहुसंख्य कामगारांचं ‘दुःखदैन्य’ वेशीला टांगूनच, असं बोनस-वाटप केलं जातंय, हे वेदनादायक सत्य, जगासमोर यायलाच हवं...गेल्या काही वर्षांतील ‘कंपनी-दहशतवादा’मुळे (‘Corporate-Terrorism'), भयंकर मानसिक-आर्थिक तणाव कंपनीत निर्माण झाल्याच्या निषेधार्ह पार्श्वभूमीवर, अनेक कामगारांचं मानसिक-स्वास्थ्य बिघडल्याची वस्तुस्थिती युनियनने वेळोवेळी कंपनी-व्यवस्थापनाच्या निदर्शनास आणून दिलेली आहे. ऑगस्ट-२०२६ महिन्याच्या अखेरीस तर, युनियनच्या एका माजी कार्यकारिणी सभासदाला वाढत्या तणावातून ह्रदयविकाराचा जोरदार झटका येऊन, आपला जीव गमवावा लागलाय, याचीही नोंद व्हायला हवी.

अनेकोनेक न्यायालयीन दावे, न्यायप्रविष्ट असतानाही... आम्हाला आमच्या कामगार-सभासदांचं मनोधैर्य कायम राखण्याकामी यासंदर्भातील ‘हे विदारक सत्य’, सर्वांसमोर जाहीरपणे मांडण्यासाठी ‘बाध्य’ करणाऱ्यांची ‘असलियत’, कामगारविश्वासमोर आणणं, हे आमचं ‘धर्मकर्तव्य’ होतं व ते अंशतः, आजमितीस आम्ही पूर्ण करत आहोत...

***...विनोद मोरे***

(सरचिटणीस, सुल्झर पंप्स इंडिया एम्प्लॉईज युनियन)

---



खरं म्हटलं तर, अफाट ब्राह्मणेतरांची गणपती ही देवता कधिच नव्हती... छत्रपतींच्या राजवटीत गणपतीला कसलेच महत्त्व नव्हतं! आज सुद्धा शेतकरी, कामकरी बहुजन समाजाची गणपती देवता कुठेही नाही... खंडोबा, ज्योतिबा, अंबाबाई (विठोबा, मसोबा, विविध ग्रामदैवते व कुलदेवता इ.) हीच ब्राह्मणेतरांची दैवते, प्राचीन काळापासून पुजली-भजली जात होती अन् आजही जात आहेत. हे गणपतीचे लचांड, चित्पावन पेशव्याबरोबर कोकणातून घाटावर आले.

बहुजनांना अन् क्षत्रियांना, गणेशदेव कधीच मानवला नाही...पण, टिळकांनी त्याला सार्वजनिकत्वाचा शेंदूर फासून महाराष्ट्राच्या पदरात बांधला!

***...प्रबोधनकार ठाकरे***

## ‘बामणी’ टिळक ‘राष्ट्रपुरुष’ झाले !



टिळकांनी ‘केसरी’ सुरू केला, त्यानंतर त्यांचा बामणीपणा कमी कमी होत पूर्ण नाहीसा झाला. १९१६ साली ते अली बंधूंना लखनौहून आपल्या घरी घेऊन आले होते. नागपूरच्या हिंदू महासभेचे दादासाहेब खरे, हे टिळकांचा उजवा हात मानले जात...ते टिळकांना उजवीकडे ओढू पाहत, तर ब्राह्मणेतर चळवळीचे विठ्ठल रामजी शिंदे बहुजनांकडे ! आपल्या वकिली कौशल्याने आणि प्राणाची पर्वा न करता टिळकांनी ब्रिटिशांशी झुंज दिली, ‘आईन्स्टाईन’सारखे जगप्रसिद्ध विद्वान शास्त्रज्ञही टिळकांच्या पाठीशी उभे राहिले...आणि, अखेर देशाने त्यांना राष्ट्रपुरुष म्हणून मानवंदना दिली!

...त्यांच्या अंत्ययात्रेइतका अफाट जनसमुदाय मुंबईने आजवर पाहिलेला नाही...!!!

***...सुनील कर्णिक***

# 'वॉलमेट' या बहुराष्ट्रीय कंपनीमध्ये...भव्य पगार / बोनस वाढीच्या त्रैवार्षिक कराराची, 'राजन राजे' व 'धर्मराज्य'तर्फे फटाक्यांची सलग दुसरी आतषबाजी...!!!

...पृष्ठ क्र. १ वरुन

तुमच्या प्रगतीचं महाद्वार खुलं होत जाईल'', असं तीन वर्षांपूर्वीच्या पहिल्या कराराप्रसंगी संघटनेचे अध्यक्ष राजन राजे यांनी केलेल्या आवाहनाला, कामगारांकडून उदंड प्रतिसाद लाभून...मागील वर्षी सुमारे १८० कोटींची उलाढाल कंपनीने साध्य केली.

**''तीन वर्षांपूर्वी कायम-कामगारांचा पगार, ज्या पातळीवर होता, त्या तुलनेत केवळ दोन करारांच्या या सहा वर्षांच्या अल्प कालावधीतच...अनेक कामगारांच्या पगारात अंदाजे १००% पर्यंत; तर, काही कामगारांच्या बाबतीत १००% पेक्षाही अधिक वाढ (म्हणजे दुपटीहून अधिक पगार) होणार...त्याचप्रमाणेच, कराराच्या कालावधीत, बहुतांश कामगारांचे (एकूण १५२ पैकी अंदाजे १३० कामगारांचे) 'सहा आकडी बोनस'चे (रु. एक लाखाहून अधिक) 'सुवर्णस्वप्न'...या कराराद्वारे साकार होणार!''**

...मुख्य मुद्दा हा की, सध्याच्या '४ काळ्या कामगार-संहितां'च्या कामगारविरोधी प्रतिकूल प्रवाहाविरुद्ध पोहून जात... वॉलमेट-कंपनीतील, एकूण एक सगळ्या 'कंत्राटी-कामगारां'ना गुलामीतून (Neo-Slavery of Socio-economic Participatiory Exclusion) बाहेर काढून 'कायम' करणारी व त्यांच्या आर्थिक-उन्नयनाची मुहूर्तमेढ रोवणारी...ही 'धर्मराज्य-परंपरे'तील क्रांतिकारक व लोकविलक्षण 'वॉलमेट करार-मालिका'च होय!

...गेल्या त्रैवार्षिक-करारातील रु.१५,०००/- (रु. पंधरा हजार) थेट पगारवाढ व या कराराद्वारे होऊ घातलेली रु.२१,०००/- (रु. एकवीस हजार) थेट पगारवाढ मिळून दोन करारांद्वारे ६ वर्षात एकूण होणारी थेट पगारवाढ रु.३६,०००/- (रु. छत्तीस हजार) एवढी भव्यदिव्य होय!

## त्रैवार्षिक-करारातील महत्त्वपूर्ण तपशील व मुद्दे.

• या त्रैवार्षिक पगारवाढीच्या करारान्वये, कायम-कामगारांची 'थेट पगारवाढ' (C.T.C. वगैरे सारख्या, अलिकडच्या काळातील ''व्यवस्थापकीय फसव्या संकल्पने''नुसार नव्हे!) रु.२१,०००/- (रु. एकवीस हजार)....

• रु.२१,०००/- या त्रैवार्षिक थेट पगारवाढीचं प्रतिवर्ष-वाटप अनुक्रमे ५०% : २५% : २५%

एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ रु.१०,५००/-
एप्रिल २०२७ ते मार्च २०२८ रु.५,२५०/-
एप्रिल २०२८ ते मार्च २०२९ रु.५,२५०/-

...यामधील, ७०% पगारवाढ बेसिक पगारामध्ये (PF-Base) व उर्वरित ३०% इतर अलाऊंसेसमध्ये...!!! (व्यवस्थापकीय परिभाषेतील C.T.C. पगारवाढ अंदाजे, रु.२३,४७२/-हूनही अधिक)

• एप्रिल-२०२६ मध्ये 'कायम' करण्यात आलेल्या कंत्राटी-कामगारांसाठीची पगारवाढ रु.१६,०००/-

एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ रु.८,०००/-
एप्रिल २०२७ ते मार्च २०२८ रु.४,०००/-
एप्रिल २०२८ ते मार्च २०२९ रु.४,०००/-

...यामधीलही, ७०% पगारवाढ 'बेसिक-पगारा'मध्ये (PF-Base) आणि ३०% पगारवाढ इतर अलाऊंसेसमध्ये....

• बोनस / सानुग्रह-अनुदान : एकूण पगारावर (Gross Earnings) १५%... त्यामधील, १०% दिवाळीमध्ये आणि ५% मार्चमध्ये (व्हेरिएबल...KPI)

• निवृत्तीपर लाभ (Retirement Benefit) : रु.३५,०००/- वरुन रु.५०,०००/- पर्यंत (रु.१५,००० ची वाढ)

• जनरल शिफ्टची वेळ अर्ध्या तासाने कमी करण्यात आलेली आहे.

आधीची वेळ स. ८.३० ते सं. ५.३०

आताची, सुधारित वेळ १ ऑक्टोबरपासून : स. ८.३० ते सं. ५.००

• महिन्याच्या पाचव्या 'शनिवारी सुटी'चा लाभ (पाचव्या शनिवारी, महिना अखेरीस कामाचा व्याप असल्याने, ज्या महिन्यात पाच शनिवार येतील; त्या महिन्यातल्या 'चौथ्या शनिवारी' सुटी ठेवण्यात आलीय)

• मृत्युपश्चात लाभ : युनियन-सभासद असलेल्या कामगाराचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास, त्या कामगाराच्या अधिकृत वारसास, प्रत्येक युनियन-सभासद असलेल्या कामगाराच्या वेतनामधून...एका दिवसाचा (Gross) पगार कापून, प्रासंगिक 'आर्थिक-मदत' देण्याची तरतूद, या करारात करण्यात आलेली आहे.

• खास तरतूद : युनियन-सभासद असलेले; पण, कायम नसलेले उर्वरित सात कंत्राटी-कामगार वर्ष-२०२७ एप्रिलमध्ये 'कायम' होणार आणि त्यांची स्वतंत्रपणे होणारी पगारवाढ रु.१२,०००/-

एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ रु.४,०००/-
एप्रिल २०२७ ते मार्च २०२८ रु.४,०००/-
एप्रिल २०२८ ते मार्च २०२९ रु.४०००/-

**...अभेद्य कामगार-एकजुटीच्या बळावर, आश्चर्यकारकरित्या औद्योगिकविश्वात 'वॉलमेट-चमत्कार' घडत असला; तरी, त्याचं यथोचित श्रेय, 'वॉलमेट व्यवस्थापना'लाही देणं अगत्याचं आहे; त्याचं कारण हे की, ''वॉलमेट (VALMET), ही बहुराष्ट्रीय इंजिनिअरिंग कंपनी, फिनलंडमधली म्हणजेच 'नॉर्डिक' देशांमधली असल्यानेच...त्या सर्व नॉर्डिक देशांमध्ये, सार्वत्रिकरित्या राबवल्या जाणाऱ्या 'समृद्धी सर्वांची' या तत्त्वानुसार (Common OR Shared Prosperity), वॉलमेट-कंपनीचे व्यवस्थापकीय-धोरण...हे कामगारहितदक्ष व बरंचस पारदर्शक आहे. 'वॉलमेट'च्या जाहीर/लिखित जागतिक-धोरणात (Global Policy), कामगारांच्या युनियन करण्याच्या व द्विपक्षीय वाटाघाटीद्वारे (Collective Bargaining) पगारवाढीचे करार वगैरे करण्याच्या मूलभूत हक्काला, सुस्पष्टपणे सन्मान बहाल केलेला आहे; जेव्हा, इतर अनेक बहुराष्ट्रीय कंपन्या, सध्या भारतात अमानुषपणे 'कंपनी-दहशतवादा'चा (Corporate-Terrorism) नंगानाच घडवून उघडपणे 'युनियनबाजी' संपवण्याचे घृणास्पद गुन्हेगारी धंदे, अत्यंत निर्लज्जपणे करत असतात व त्यातून कंपन्यांच्या नफ्याचे आकडे फुगवता फुगवता, कॉर्पोरेटीय-भ्रष्टाचारालाही मोठी चालना देत असतात!''**

नवी मुंबई येथील रमाडा हॉटेलमध्ये व्यवस्थापन व संघटनेच्या पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करारावर स्वाक्षऱ्या होत असताना...कंपनीचे संचालक (Plant Director) सर्वश्री कृणाल भावसार यांनी उपस्थितांना संबोधित करताना, ''धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचं तोंडभरुन कौतुक करत, वॉलमेट-व्यवस्थापन, युनियन-कारभाराप्रति अतिशय समाधानी व संतुष्ट असल्याचं सांगितलं व अशी 'जबाबदार' युनियन आमच्या कंपनीला लाभली, म्हणून आम्ही नशीबवान आहोत'', असं आवर्जून सांगितलं.

यावेळी, वालमेट व्यवस्थापनाचे संचालक कृणाल भावसार यांच्यासह शिरीष राजाध्यक्ष, विश्वास लेले, ब्लेसी डिकॉस्ट्रा, सुचिता भंडारी, राजेंद्र टोके, प्रफुल जोशी, मनीष लाहोटी, रिना मुल्ला; तसेच, 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'चे अध्यक्ष राजन राजे, उपाध्यक्ष रमाकांत नेवरेकर, महासचिव महेश ठाकूर सिंग, सचिव समीर चव्हाण आणि स्थानिक कंपनी-कमिटीतर्फे कमलेश कोल्हे (युनिट अध्यक्ष), अविनाश बढे (युनिट उपाध्यक्ष), लोटन येलवे (युनिट सचिव), संदीप पवार (युनिट कोषाध्यक्ष), लक्ष्मण शिंदे (युनिट संयुक्त-कोषाध्यक्ष); तसेच, मिलिंद जोशी, सुभाष देशमुख, निलेश जगताप हे सर्व युनिट समिती-सदस्य उपस्थित होते.

---

## 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या यशस्वितेची कामगार धोरण-सूत्रे संक्षेपाने.....

१) ''आधी नितीमंत...मगच, श्रीमंत!''

२) ''आळशी उद्धट कामगार राष्ट्राला भार... मेहनती-नीतिमान कामगार राष्ट्राला आधार...!!!

३) 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ', 'म्हणजे...समृद्धी सर्वांची' (Common Prosperity) तत्त्व' नाकारणाऱ्या भांडवलदारांची संघर्षातून हवा तंग; तर, 'तत्त्व' स्विकारणाऱ्या भांडवलदारांशी परिपूर्ण सहकार्याचा (Collaboration) सकारात्मक ढंग!

४) ''किमान-वेतन रु. ४० हजार प्रति मास... न देणाऱ्यास तुरुंगवास!''

५) 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ' म्हणजे...संघर्ष आणि सहकार्याचा एकमेवाद्वितीय 'मापदंड'...'' कामगारांनो, जेवढं तुम्ही मनापासून काम करणार आणि जेवढं तुम्ही चिकाटी व धैर्याने लढणार; तेवढं तुम्हाला मिळणार!''

६) 'DOWN WITH 'CONTRACT-LABOUR'!''...कंत्राटी-कामगार = गुलाम + नव-अस्पृश्य; तर, कंत्राटदार = 'श्रमचोरी' करणारा दरोडेखोर

# पत्रकारिकेत अभिजात मराठीचा दुष्काळ

आजकाल 'अभिजात मराठी'चा गजर सुरू आहे. पण अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचा आनंद व्यक्त करणे वेगळे आणि त्या भाषेचे खरे आकलन असणे वेगळे. दुर्दैवाने, आपल्या माध्यमविश्वात या दोन गोष्टींची सरमिसळ झाली आहे. **भाषेच्या नावाने ढोल बडवणारे अनेक पत्रकार प्रत्यक्षात मराठी भाषेच्या शब्दसंपत्तीपासून, तिच्या वाक्प्रचारांपासून, तिच्या सांस्कृतिक संदर्भांपासून आणि तिच्या भाषिक परंपरेपासून किती तुटलेले आहेत, हे 'मुंबई तक' आणि तत्सम माध्यमांतील पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नांमधूनच उघड होत असते. प्रसिद्ध संस्कृत श्लोक माहित नसणे हे काही अभिमानाचे लक्षण नव्हे. त्यासाठी प्रत्येक पत्रकार संस्कृतचा अभ्यासक असायलाच हवा असेही नाही. परंतु ज्याला महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि भाषिक परंपरेशी संबंधित व्यक्तीची मुलाखत घ्यायची आहे, त्याने किमान त्या विषयाची पूर्वतयारी करावी, एवढी अपेक्षा करणे गैर नाही. त्याहूनही महत्त्वाचे म्हणजे, मराठीतील प्रचलित आणि अर्थपूर्ण शब्द समजून घेण्याची कुवत पत्रकाराकडे असावी. 'शर्करावगुंठीत' यांसारखा मराठीतील अर्थवाही शब्द ऐकून त्याचा संदर्भ समजत नसेल, तर 'अभिजात मराठी'च्या गौरवाची भाषणे देणाऱ्यांनी स्वतःच्या भाषिक दारिद्र्याकडेही एकदा पाहायला हवे.**

भाषेचे ज्ञान म्हणजे केवळ शुद्धलेखनाच्या दोन-चार चुका न करणे नव्हे. भाषा म्हणजे शब्दांचा अर्थ, शब्दामागचा सांस्कृतिक संदर्भ, वाक्यरचनेतील सूक्ष्मता, उपरोध ओळखण्याची क्षमता, प्रतिमा आणि रूपक समजण्याची ताकद आणि समोरचा माणूस नेमके काय म्हणतो आहे हे ऐकून घेण्याची बुद्धी. पत्रकाराच्या हातात कॅमेरा आणि ध्वनिमुद्रक यंत्र असणे पुरेसे नाही; त्याच्या डोक्यात योग्य प्रश्न असणेही आवश्यक आहे. त्याहून महत्त्वाचे म्हणजे, त्या प्रश्नामागे विषयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे. पण **हल्ली अनेकदा मुलाखत गंभीर संवाद न राहता मुलाखत घेणाऱ्याची फिरकी घेण्यासाठी खिदळण्याचा कार्यक्रम झाला आहे की काय असे वाटायला लागणारी परिस्थिती आहे. समोरचा एखादा गंभीर सामाजिक, वैज्ञानिक, वैचारिक किंवा भाषिक मुद्दा मांडत असताना पत्रकारांनी त्याच्याकडे छद्मी चेहऱ्याने पहात खिदळणे, एकमेकांकडे पाहून कुत्सीतपणे हसणे, विषयाचे गांभीर्य कमी करण्यासाठी अर्धवट विनोद करणे किंवा वक्त्याच्या भूमिकेकडे जणू काही मनोरंजन म्हणून पाहणे, ही पत्रकारिता नव्हे. याला उथळ आणि उठवळ टिंगलटवाळी करणे म्हणतात. प्रश्न विचारण्याच्या नावाखाली समोरच्या व्यक्तीला अडचणीत आणणे आणि त्याच्या विचारांची चिकित्सा करण्याऐवजी त्याच्या बोलण्याच्या पद्धतीवर किंवा व्यक्तिमत्त्वावर हसणे, हा पत्रकारितेचा बौद्धिक पराभव आहे.**

विशेषतः एखाद्या व्यक्तीची मुलाखत घेताना पत्रकाराने दोन गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात-एक म्हणजे प्रश्न विचारणारा हा सर्वज्ञ नसतो आणि दुसरे म्हणजे मुलाखत देणारा हा विदूषक नसतो. पत्रकाराचे काम समोरच्याला बोलते करणे, त्याच्या भूमिकेतील अंतर्विरोध शोधणे, त्याला प्रतिप्रश्न करणे, पुरावे मागणे आणि वाचक किंवा प्रेक्षकाला विषय समजावून देणे हे आहे. त्याऐवजी प्रश्नच उथळ असतील, प्रश्नांमध्ये विषयाचे प्राथमिक ज्ञानही दिसत नसेल आणि समोरचा गंभीरपणे बोलत असताना मुलाखतकारच खिदळत असेल, तर त्या कार्यक्रमातून समोरच्या व्यक्तीपेक्षा पत्रकारांचे अज्ञान अधिक ठळकपणे समोर येते. 'मुंबई तक'च्या मुख्य संपादकापासून त्यांच्या टोळीतील इतर काही पत्रकारांमध्ये दिसणारी ही वृत्ती म्हणूनच केवळ भाषेची समस्या नाही; ती पत्रकारितेच्या संस्कारांची समस्या आहे. ज्यांना प्रमाण मराठी भाषा म्हणजे नेमके काय, भाषेतील शब्दांचा नेमका अर्थ काय, एखाद्या वाक्प्रचारामागचा संदर्भ काय आणि एखादा वक्ता नेमका कोणता वैचारिक मुद्दा मांडतो आहे हे समजून घेण्याची गरज वाटत नाही, त्यांनी 'अभिजात मराठी'चा जयघोष करणे म्हणजे घरात पुस्तकांचा गठ्ठा ठेवून एकही पुस्तक न वाचता स्वतःच्या वाचनसंस्कृतीचा टेंभा मिरवण्यासारखे आहे.




**पत्रकाराला प्रत्येक शब्द माहित असणे अपेक्षित नाही; पण शब्द माहित नसल्याचे भान असणे अपेक्षित आहे. एखादा शब्द कळला नाही तर त्याचा अर्थ विचारता येतो. एखादा संदर्भ माहित नसेल तर पूर्वतयारी करता येते. एखादा श्लोक माहित नसेल तर त्याचा संदर्भ शोधता येतो. परंतु माहितीचा अभाव लपवण्यासाठी खिदळणे, विषयाची खिल्ली उडवणे किंवा प्रश्नाला विनोदी वळण देणे हा अत्यंत सोपा आणि बौद्धिकदृष्ट्या आळशी मार्ग आहे. पत्रकारितेतील सर्वांत मोठी समस्या अज्ञानाबद्दलची बेफिकिरी आहे. ज्याला स्वतःलाच काही माहित नाही, आणि माहित करून घेण्याची इच्छाही नाही, तो पत्रकार प्रश्न विचारत नाही; तो केवळ आवाज करतो. आणि जेव्हा अशा पत्रकारांच्या हातात माध्यमाचे व्यासपीठ येते, तेव्हा प्रेक्षकाला माहिती मिळत नाही; आणि दिसते ते पत्रकारांच्या अज्ञानाचे सार्वजनिक प्रदर्शन.**

गंभीर विषयावर बोलणाऱ्या व्यक्तीकडे विकृत विनोदी वृत्तीने पाहणे ही हलक्या वृत्तीची पत्रकारिता झाली. गंभीरता म्हणजे चेहरा कायम गंभीर ठेवणे नव्हे, हेही खरे; पण विनोद आणि उपहास यांच्यातील फरक समजणे ही पत्रकाराची प्राथमिक जबाबदारी आहे. समोरचा विचार मांडत असताना त्यातील विसंगती दाखवण्यासाठी विनोद केला तर तो पत्रकारितेचा भाग ठरू शकतो. परंतु विषय समजून न घेता वक्त्याच्या गांभीर्यावरच हसणे म्हणजे स्वतःच्या बौद्धिक उथळपणाचे प्रदर्शन करणे होय. या पत्रकारांच्या अशा उथळ कृतींना विद्यानंद बापटांनी मात्र चोख उत्तरे देऊन मूळ मुद्दा भरकटू दिला नाही, हे त्यांचे कौशल्य.

आज माध्यमांमध्ये आवाज मोठा झाला आहे; आणि भाषेची खोली कमी झाली आहे. कॅमेरे अधिक झाले आहेत; त्याच वेळेस अभ्यास कमी झाला आहे. थेट प्रक्षेपण वाढले आहे; पण पूर्वतयारी कमी पडते आहे. प्रश्नांची संख्या वाढली आहे; पण प्रश्नांची गुणवत्ता घटली आहे. पत्रकाराला बोलण्याची घाई असते; त्याची ऐकण्याची सवय मात्र कमी होत चालली आहे. परिणामी मुलाखत ही विचारांची देवाणघेवाण न राहता खिदळण्याचा, मध्येच तोडण्याचा आणि स्वतःचे अज्ञान झाकण्याचा कार्यक्रम बनतो.

**'अभिजात मराठी'चा खरा सन्मान करायचा असेल; तर, प्रथम त्या भाषेतील शब्द समजून घ्यावे लागतील. तिची परंपरा वाचावी लागेल. तिच्या संतसाहित्यापासून आधुनिक वैचारिक साहित्यापर्यंतचा प्रवास समजून घ्यावा लागेल. संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश आणि मराठी यांच्या परस्परसंबंधांचा अभ्यास करावा लागेल. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, भाषा ही विचार करण्याच्या पद्धतीत असते, प्रश्न विचारण्याच्या पद्धतीत असते आणि दुसऱ्याचे म्हणणे समजून घेण्याच्या क्षमतेत असते, हे लक्षात ठेवावे लागेल.** म्हणून प्रश्न अधिक गंभीर आहे. ज्या माध्यमकर्मींना भाषेचा अर्थ, संदर्भ आणि गांभीर्य समजत नाही, ते समाजाच्या विचारविश्वाचे प्रतिनिधित्व करण्याच्या योग्यतेचे आहेत का? अभिजात मराठीचा जयघोष करणाऱ्या पत्रकारांनी आधी स्वतःच्या भाषिक आणि बौद्धिक दारिद्र्याकडे पाहावे. कारण पत्रकारिता ही खिदळवृत्ती नाही; ती प्रश्न विचारणारी आणि बौद्धिक कस पाहणारी वृत्ती आहे. ज्यांना प्रश्न कसे विचारायचे हेच माहीत नाही, त्यांनी किमान एवढे तरी लक्षात ठेवावे की मायक्रोफोन हातात आला म्हणून पत्रकारिता करण्याची अक्कल आली असे नव्हे.



*- जगदीश काबरे*

(लेखक समाजचिंतक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारक आहेत.)

# हे गणराया, गणनायका, बुद्धीदात्या, बुद्धीच्या देवता....

तू आज आलायस खरा,

पण, तुझ्यात ना, अलीकडे मला फार फार फरक जाणवायला लागलाय...

बुद्धीचं लेणं घेऊन तू येतोस खरा,

पण, हिंदुत्वाचं थोतांड माजवणाऱ्यांनी

अन् हिंदुत्वाच्या मखरात

तुझी 'राजकीय-प्रतिष्ठापना' करणाऱ्यांनी...

नासवलेल्या, नादावलेल्या

आमच्या मायमराठी लेकरांना अन् मोकाट सुटलेल्या मराठी तरुणाईला...

ते तुझं, बुद्धीचं लेणं द्यायला,

फारच तू विसरायला लागलायस हल्ली...

तेव्हा, बंगल्याबाहेर नाही का लावतात पाटी, ''कुत्र्यापासून सावधान!'',

...तशी एक पाटी, मी तुझ्यासाठी बनवून आणलीय,

''बोगस हिंदुत्ववाद्यांपासून सावधान!''

...म्हटलं, न जाणो त्यांच्या सोंगाढोंगाला निदान तू तरी, फसायला नकोस!

...नाहीतर, बुद्धीचं दैवत, हा तुझा लौकिक डागाळणार नाही का?

...त्याला कारणही तसंच आहे, बाप्पा!

रस्तोरस्ती 'डीजे'वर कर्कश्श गाणी लावून तुझ्या आगमनापासून विसर्जनापर्यंत...

कान फुटेस्तोवर ढोलताशे बडवून...हेच हिंदुत्वाचं सोंगढोंग वठवणारे, काय ती तुझी, भक्ति-आरती वगैरे करतात ना?

लंबकर्णा, त्या ध्वनी प्रदूषणानेच तुझे कान, प्रतिवर्षी अजून थोडे लांब लांब होतायत का रे?

...आणि, तरीही, त्या बेगडी भक्तिला तू फसलास तर,

केवढी पंचाईत व्हायची!

...रानडे, गोखले, आगरकरांचा विरोध डावलून,

टिळकांनी जनजागृतीसाठी तुला रस्त्यावर आणून ठेवला;

तर, मुंबईतल्या उत्सवी-आयोजनात भिक्षुकीपेशाच्या...

अन्याय्य वर्चस्वाविरुद्ध बंड करुन उठलेल्या प्रबोधनकारांनी,

थेट, तुझ्या मूर्तिभंजनाची धमकी दिली होती...

...खरंतरं, इथपर्यंत सगळं ठीकच होतं, गणराया!

पण, मग सगळी बुद्धीच गहाण ठेवल्यासारखा, हल्ली उभा महाराष्ट्र...

गल्लोगल्ली-रस्तोरस्ती, पानठेल्यांसारखा उत्सवी 'ठेला' तुझा मांडून,

...आणि, मंडपाच्या पलिकडे ''नोटबंदी तिथे ओशाळावी''...असा पत्त्यांचा भला थोरला जुगार मांडून,

घोर कलियुग कसं असतं, ते तुझं तुला दाखवलं जात असतानाही...

तू काहीही न करता, मणिपूर जळत असताना मख्ख बसणाऱ्या, दिल्लीश्वरांसारखा मख्खच कसा?

तू कुणा मंत्र्याचा राजीनामा घ्यावा, ही पॅसिफिक समुद्रापारची हाक नाही...की,

दिल्ली पोलिसांसारखी तू पॅलेट-गन चालवावी,

लाठ्यांना खिळे ठोकावेत...अशीही आमची अपेक्षा नाही;

पण, मराठी 'जेन-झी'ला तू काही आवर घालशील की, नाही?

...हे असं बेजबाबदार वागणं, बुद्धीदात्या शोभतं तुला?

तू स्वतःला भारताचा पंतप्रधान समजतोयस की काय, असं बेजबाबदार वागायला??

...आणि, हे बघ, तुला खरंच पंतप्रधान व्हायचंच असेल ना, गजानना; तर तुझ्या लंबकर्णात नागपुरी गुज्जूगुपित (गुजगुपित नव्हे) सांगतो...

इथे तवा आयताच तापलेला आहे...तू फक्त पोळ्या लाटायची तसदी घे!

(पोळ्यांवर भागवायचं हं...तसंही गूळपीठ महागल्याने, मोदकाचा प्रसाद, खिशाला अंमळ भारीच रे गणराया; तेव्हा जरा समजून घे)...



सांगायचा मुद्दा; तुला त्या एतद् किंवा डखठ घोटाळ्यांचा आसरा घ्यायची गरजच नाही, बाप्पा!

आधीच 'मंद' बुद्धीचे भक्त 'अंध', भारतभर हातपाय पसरुन बसलेत...त्यात, तुझ्या 'डीजे'वाल्या 'ढ' भक्तांची मोठी भर!

अरे मग, लागली की आपली संसदीय 'मेजॉरिटी'ची सोय...टेन्शन कसलं?

'कमोड'वर सुद्धा 'इलेक्शन-मोड'मध्ये बसत...नायडू-नितीशच्या नाकदुऱ्या काढायचं,

...ते आघाडीबिघाडीचं, आता झंझटच नाही!

हे बघ, तुझ्यावर मी उगीच काही आरोप वगैरे करत नाहीय की, खोटंही बोलत नाही...

खोट्टं खोट्टं पण, ते रेटून मोठ्ठं मोठ्ठं बोलणं शिकायला, मी काही...

५२ वर्षे तिरंगा न फडकवणाऱ्यांच्या कुठल्या शाखेत...

कधि हाफ-पँट घालून गेलेलो नाही... की,

उगीचच विरोधकांवर बेछूट आरोप करायला

...आणि 'ठरवून' कुणाकुणाची खोटी बदनामी करायला,

'भगव्या' राजकीय तालमीतही तयार झालेलो नाही....

...तू विघ्नहर्ता ना रे?

मग, तुझे भोंदू हिंदुत्ववादी भक्त, विघ्नकर्ते कसे?

...ते ही, फक्त आपल्या विरोधकांच्या बाबतीतच??

तू जसा ''गणानां त्वां गणपती'' म्हणजे, गणांचा नायक म्हणून तुझ्या 'गणा'त सामील होणाऱ्यांचं रक्षण करतोस ना...

तसेच हे, सत्ताधारी 'दिल्लीश्वर'सुद्धा,

उफराट्या पद्धतीने का होईना; पण, एकदा का कुणी त्यांच्या भगव्या वा राममंदिर-चंदाचोर 'भामट्या' गणात सामील झाला रे झाला की, बघ...

''संकटी पावावे, निर्वाणी रक्षावे'' अशी वॉशिंग-मशिनमधल्या कपड्यांसारखी एकदम पलटी मारुन,

विघ्नकर्त्याचे त्यांच्यासाठी, तुझ्यासारखेच डिट्टो विघ्नहर्ते होतात!

...सध्या महाराष्ट्रात, 'दिल्लीश्वर' ज्यांना पावला, अशा गणांची संख्या,

''सूरत ते गोवा, व्हाया गुवाहाटी'' पंचतारांकित प्रवास करत,

...एकदाची जी ''अलिबाबा आणि चाळीस चोरांएवढी झाली'', ती संख्या ''वाढता वाढिता वाढे भेदिले संसद-मंडळा'' म्हणून, अजूनही देशभर पुढे 'सिंहासन बत्तिशी'सारखी वाढतच चाललीय की रे बाप्पा...आहेस कुठे तू?

...बाकी काही म्हण, पण 'लंबोदरा', तुझं सुटलेलं पोट मात्र, हल्ली पार खपाटीला जात चाललंय...आमच्या महाराष्ट्रातल्या कंत्राटी-कामगारांसारखं!

...एवढी त्यांच्याविषयी सहसंवेदना बरी नव्हे गणराया...त्याचा आपल्या तब्येतीवर परिणाम होतो रे 'राजा' (हे आपलं मुंबईतलं तुझं खास संबोधन)!

अरे, तुझ्यापेक्षा ते आजमितीला, हाताच्या बोटावर मोजण्याएवढे शिल्लक राहीलेले,

कंपन्यांमधले 'कायम कामगार' बरे शहाणे म्हणायचे की रे...

...कारण, त्यांना खेटूनच गुलामासारखं राब राब राबणार्या कंत्राटी-कामगारांकडे, ढुंकून पण पहात नाहीत ते!

आपले स्वतःचे पगार-बोनस वाढल्याशी त्यांना मतलब!

...कशाला उगीच बाता मारत बसायच्या आपण कामगारधर्माच्या, रे गणराया?

हं आठवलं...देवा, तुला त्या अग्निपथावरील भग्नवीरांच्या 'वाळक्या' पोटाची समस्या, अंतर्ज्ञानाने आधीच समजली, म्हणून तर, तू एवढा वाळलास नाहीस ना रे?

कसल्या 'लष्करा'च्या भाकऱ्या भाजू पहातोयस गणेशा,

...हो की, जरा प्रोफेशनल!

...बरं हे बघ, तू जाच्यावर बसून आलायस ना; त्या तुझ्या मूषकाला तरी आवर बाप्पा,

तुझा तो 'वाहन' वगैरे आहे, हे ठीक...

पण, सध्या त्याने महागाईचं उग्र रुप धारण केलंय...

तुझं वाहन मूषक, सरळ रोखठोक भाषेत सांगायचं तर...

तुझा तो उंदीर, 'महागाईचं प्रतीक' बनलाय!

...सारखा आपला आमचा खिसा, सरावलेल्या खिसेकापूसारखा कातरत असतो,

वर चिंचोळ्या तोंडातून कर्णकटू हिंदुत्वाचा 'चित्कार' की 'फुत्कार' काय म्हणतात तो, सारखा टाकत असतो!

...जीव आमचा नुसता नकोसा केलाय मेल्यानं, आवर त्याला!

सरतेशेवटी गजानना, गणराया... जे जाणवलं ते अखेर धाडसानं बोलतोच; अगदी जंतरमंतरवरच्या जेन-झी सारखं!

तुझा प्रेमळ दयाळू, कृपाळू असणारा चेहरा...हल्ली काहीसा उग्र, संतप्त का दिसू लागलाय, बाप्पा?

तुझा देह म्हणजे, मनुष्ययोनी आणि मस्तक म्हणजे, पशुयोनी...यातून, ८४ लक्ष योनींमधल्या एकत्वाचा किंवा अद्वैताचा, ''तत् त्वम् असि'' असा, हिंदुत्वाचा महान संदेश देणाऱ्या मंगलमूर्तिराया...

अरे आम्ही सारे मानव मातलो, उन्मत्त झालो...

त्यातून निसर्ग-पर्यावरणाचा, वन्यजीवांचा, जलचरांचा, पक्षी-कीटकांचा...

केवढा विध्वंस करुन बसलोय आम्ही...भौतिक 'विकासा'च्या नादानं!

...खूप खूप संतापलायस का रे, तू आम्हा मर्त्य मानवांवर?

तुझं विसर्जन दरवर्षी आम्ही करता करता,

त्या आमच्या अक्षम्य अपराधाची सजा म्हणून,

जागतिक-तापमानवाढीच्या पर्यावरणीय महासंकटातून,

होऊ घातलेल्या जगबुडीत; तूच, आमचं विसर्जन करण्याची...

''वार्ता विघ्नाची'' देऊ पहातोयस की, काय...???

***...राजन राजे*** *(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)*

## स्पेस

प्रश्न फक्त ध्वनी प्रदूषण, गणपतीपुढे डीजे-डॉल्बी आणि ध्वनी प्रदूषणापुरता मर्यादित नाहीच.

प्रश्न असा आहे की आपल्याला उपलब्ध असलेल्या स्पेसवर, म्हणजे अवकाशावर अधिकार कोणाचा आहे, असा आहे.

आपली स्पेस आपल्या गल्लीतल्या रस्त्यावरची असो की घरातली, सामाजिक असो की सांस्कृतिक, आर्थिक असो की राजकीय, धार्मिक असो की जातीय...

यावर निर्णायक चर्चा डीजे-डॉल्बीच्या निमित्ताने व्हायला हवी.

स्पेस अमर्याद आहे, ठीक आहे. ही थिअरी झाली. प्रत्यक्षात तिचा दुष्काळ निर्माण करून तिच्यात स्वतः आडवे-तिडवे पसरून आक्रमक रीतीने, रण 'धुंदूभी', डीजे-बिजे वाजवून, कोणावर तरी सूड घेऊन ऑक्युपाय करणे आणि बाकीच्यांनी उरलेल्या लहान स्पेसमध्ये समाधान मानणे, ॲडजस्ट करणे, स्वतःला आकुंचित करून सुरक्षित करून घेणे, आजारी पडणे, बहिरे-अंध होणे, मरून जाणे... किंवा अगदीच सहन झाले नाही तर विस्थापित होणे, या गोष्टींना आपण आज निवडून दिलेल्या अनिर्बंध सत्तेची अधिमान्यता आहे. या बाकीच्या वंचित जीवांमध्ये शहरी गरीब, मध्यमवर्गीय लोकांसोबत, आदिवासी, भटके वगैरे आहेतच. पण त्यासोबत प्राणी, पक्षी, काजवे, फुलपाखरे आणि मधमाशाही आहेत.

**सत्तेच्या डोक्यातल्या विकासाच्या मार्गात येणारी झाडे, शेती, माती, हवा, पाणी, भूगर्भ, नद्या, तलाव, डोंगर-दऱ्या, जंगले यांची हक्काची स्पेसदेखील नष्ट होण्याचा प्रश्न आहे. त्यासाठी पैसा, बुलडोझर, जेसीबी, पोलीस, आर्मी, प्रचंड राष्ट्रीय बजेट आणि राखीव स्वयंसेवक आर्मी वापरण्याचा प्रश्न आहे. हिंसेने स्पेस काबीज करता येते, हे सत्तेला चांगले ठाऊक आहे. मणिपूर असो की तपोवन, की अबूजमाड, की वाढवण बंदर...**

इंटरनेट, सोशल मीडिया, आपला डेटा, डिजिटल जग, टीव्ही, सिनेमा हीदेखील एक आपली सर्वांची प्रचंड स्पेस आहे. ती कोणाच्या ताब्यात आहे, हा प्रश्न आहे.

आपले स्वयंपाकघर, त्यात शिजणारे अन्न, स्वाद, चवीचे पदार्थ हीदेखील आपली पूर्वापार समृद्ध स्पेस आहे. त्यावरदेखील बंधने येतायत. हे खाऊ नका, ते शिजवू नका... किचनची ही आपली खास वैयक्तिक, चविष्ट, स्वादिष्ट स्पेस आता लहान होत चालली आहे.

आपले सुंदर सण-उत्सव यांची एक अफलातून, देखणी स्पेस आहे/होती. ती आज कोणाच्या ताब्यात गेलीय?

**आज पुण्यात सुरू झालेले डीजे-डॉल्बी, ढोल-ताशे यांच्या भयाण आवाजाविरोधातले आंदोलन प्रचंड यशस्वी होताना दिसते आहे. त्या आशेवरच आणखी काही स्पेसेस, ज्यांचा उल्लेख वर केला आहे, त्यांच्याविषयीदेखील व्यापक आंदोलनाची गरज व्यक्त करतो आहे.**

मुद्दा फक्त आवाजाच्या स्पेसचा नाहीये...

मुद्दा आपल्या हक्काच्या, सर्व प्रकारच्या, सर्वंकष स्पेसेसचा आहे. लढाई बरीच मोठी आहे.

***...मोहन देस***

# ९९.९७ टक्के हेअर कट, अण्णा आंदोलन आणि बँकेवरचा 'कायदेशीर' दरोडा!

झी उद्योग समूह, सुभाषचंद्र गोयल, ९९.९७ टक्के हेअर कट, अण्णा आंदोलन, बँकेवर दरोडा घालणारे दरोडेखोर... त्या दरोडेखोरांनी शेजारच्या गल्लीत घातलेला राडा...!!!

झी-उद्योग समूहाच्या सुभाषचंद्र यांनी, २२,००० कोटी रुपयांच्या गॅरंटीपैकी मी फक्त ६.२५ कोटी रुपये, म्हणजे फक्त ०.०३ टक्के रकमेची भरपाई करू शकतो, असे सांगितले. छउङ्ढ ने ती भरपाई मान्य केली.

म्हणजे, कर्जदारांना दिलेल्या कर्जाच्या ९९.९७ टक्के रकमेवर पाणी सोडावे लागणार आहे.

याबद्दलच्या बातम्या आणि चर्चा कालपरवा मेनस्ट्रीम आणि सोशल मीडियावर झाली. त्याची पुनरुक्ती नको करुया आणि जे काही घडत आहे; त्याची मुळे, अण्णा आंदोलनापर्यंत कशी पोहोचतात, ते समजून घेऊया.

अण्णा आंदोलनाचे देशाच्या राजकीय अर्थव्यवस्थेच्या वैचारिक फ्रेममध्ये योगदान काय?

देशात भ्रष्टाचार होताच. पण, अण्णा आंदोलनाने देशाच्या आर्थिक प्रश्नाबाबतचा पब्लिक डिस्कोर्स / सार्वजनिक चर्चाविश्व भ्रष्टाचार-केंद्री बनवला... बस्स, एकच निकष.

दुसऱ्या शब्दात, **एखादा आर्थिक-व्यवहार प्रचलित कायद्याला धरून असेल; तर, या अण्णा लोकांचे काहीही म्हणणे नाही. मग, त्या कायद्यातील तरतुदी कितीही कॉर्पोरेट भांडवलाला भरघोस सवलती देणाऱ्या, जनविरोधी, पर्यावरणविरोधी, गरीब नागरिक विरोधी असल्या; तरी, त्यावर चर्चा नाहीच!**

...कारण, हे कायदे जनतेने निवडून दिलेल्या जनप्रतिनिधींनी बनलेल्या कायदेमंडळाने केलेले असतात. त्यावर टीका करायची म्हणजे देशद्रोह... सत्ताधारी पक्ष म्हणजे देश, त्यावर टीका म्हणजे देशद्रोह; असे Narrative बनवले गेलेय.

**आर्थिक व्यवहारांचा ना अभ्यास, ना राजकीय अर्थव्यवस्थेतील पॉवर डायनॅमिक्स कसे चालते याचे ज्ञान ना कुवत. अशा अण्णांना पुढे करून कॉर्पोरेट भांडवलशाहीने अण्णा आंदोलन स्पॉन्सर केले. सामान्य नागरिकांचे राजकीय आर्थिक-शिक्षण करण्याचा, जो काही अवकाश शिल्लक होता; तो आक्रसून टाकला. मेनस्ट्रीम-मिडीया मालकीचा केला. त्यावर देखील आर्थिक कायद्यांची चिरफाड बंद केली.**

अनेकानेक कॉर्पोरेट भांडवल / बँकिंग / वित्त क्षेत्रासाठीचे आर्थिक कायदे, योजना, रेग्युलेटरी नियम बनवले गेले. त्या फ्रेममध्ये राहून अर्थव्यवस्थेतील सरप्लस, हजारो कोटी रुपये, कॉर्पोरेट क्षेत्र आणि पिरॅमिडच्या वरच्या भागात वेगाने ट्रान्सफर होऊ लागला.

मेक नो मिस्टेक... भ्रष्टाचाराची किंमत देखील सामान्य नागरिकच मोजत असतो. पण, भ्रष्टाचार म्हणजे राजकीय-अर्थव्यवस्था नव्हे. हायपोथेटिकली (कठीण आहे मान्य) कल्पना करा देशात एका रुपयाचा भ्रष्टाचार नाहीये. तरी देखील दारिद्र्य, आर्थिक विषमता, पर्यावरणीय ऱ्हास टोकाचेच राहणार आहेत.

त्यापैकी, एक भारतीय दिवाळखोरी कायदा (IBC) आणि त्याअंतर्गत, स्थापन झालेली छउङ्ढ... जो २०१६ मध्ये कार्यरत झाला. मोठ्या कॉर्पोरेटना खुले आम कायद्याला धरुन, मोठ्या मोठ्या रकमा खिशात घालण्याचा राजमार्ग तयार झाला.

गेल्या दहा वर्षात छउङ्ढ ने मंजूर केलेले हेअर कट, बँकांची बुडालेली कर्जे, त्यांनी राईट-ऑफ केलेल्या कर्जाचे आकडे, केंद्र सरकारने दिलेले भागभांडवल... याचे लाखो कोटी रुपयांचे आकडे 'पब्लिक डोमेन'मध्ये आहेत.

**९० टक्के 'हेअर कट' गटात शिरलेले सुभाषचंद्र लेटेस्ट आहेत. त्याआधी डेक्कन क्रोनिकल ९५ टक्के, व्हिडिओकॉन ९५ टक्के, सिनर्जी ९४ टक्के, उषदेव इंटरनॅशनल ९३ टक्के, सिवा इंडस्ट्रीज ९३ टक्के, रिलायन्स, अनिल अंबानी ९९ टक्के:. आहेत... ९० टक्के 'हेअर कट'च्या खाली तर, भली मोठी यादी आहे.**

गेल्या दहा वर्षात NCLT कडे आलेल्या केसेसमध्ये सरासरी हेअर कट ६८ टक्के राहिला आहे. म्हणजे १०० रुपये देणे असेल; तर, कॉर्पोरेट-क्षेत्राने फक्त ३२ रुपये परतफेड केली आहे... या 'हेअर कट'ची एकूण रक्कम १० लाख कोटी रुपये आहे.

देशातील प्रत्येक थकीत कर्जाची केस NCLT कडे वर्ग होत नाही. इतरही अनेक पद्धतीने कर्जसंस्था / बँका आणि कर्ज घेतलेल्या कंपन्या यांच्यात सेटलमेंट होत असते. सर्व काही त्या त्या कायद्याला / योजनेला / रिझर्व्ह बँकेने आखून दिलेल्या फ्रेममध्ये होत असते. त्या मार्गाने, गेल्या दहा वर्षात अजून १५ लाख कोटी रुपये बँका / कर्जसंस्थांनी 'हेअर कट' सहन केला आहे.

**पोस्ट मोठी होईल म्हणून थांबतो. पण, थोडक्यात एक अनुषंगिक मुद्दा. कर्ज थकवल्यानंतर एमएसएमई क्षेत्रातील लाखो उद्योग आणि प्रवर्तक, गृह कर्ज घेणारे, शैक्षणिक कर्ज घेणारे विद्यार्थी, मायक्रो-क्रेडिट घेणारे गरीब आणि अर्थात, कोट्यवधी शेतकरी... यांना काय नरक यातनांमध्ये ही सिस्टीम ढकलते? कित्येक जण फक्त, त्यामुळे आत्महत्या करताहेत... किती बेशरम, संवेदनशून्य आहे ही सिस्टीम !**

कॉर्पोरेटधार्जिण्या आर्थिक-कायद्यांवर सार्वजनिक चर्चा न होता भ्रष्टाचारावर व्हाव्यात; हाच, कॉर्पोरेट-क्षेत्राचा राजकीय अजेंडा होता / राहील.

का कोणास ठाऊक. परवा 'ओटीटी'वर बघितलेला एक चित्रपट आठवला... भर शहरीवस्तीत असणाऱ्या बँकेच्या शाखेचे शटर बंद झाल्यावर, अंधार पडल्यावर दरोडेखोरांना बँकेत घुसून बँकेच्या सेफमधून पैसे लंपास करायचे असतात. कुलूप / सेफ वगैरे फोडताना आवाज होणार असतो. पोलीस चौकी जवळच असते. पोलीस आवाजाचा माग काढत येण्याची शक्यता असते. दरोडेखोर लोकल दादालोकांना पैसे देऊन, शेजारच्या गल्लीत जोरदार राडा घालायला सांगतात. मोठा गोंगाट, हाणामारी ऐकून पोलीस चौकीतील पोलीस त्या गल्लीत जातात... गोष्टीत साधर्म्य जाणवले तर, तो काही गोष्ट सांगणाऱ्याचा हेतू नाही!

***...संजीव चांदोरकर***

# गरिबीतून उभं करणाऱ्या हातांची कृतज्ञ आठवण

मी श्री. गणेश रमेश मोरे, मुरबाड तालुक्यातील डोंगरपट्ट्यातील एका छोट्याशा गावातील रहिवासी आहे. दळणवळण आणि रोजगार यापासून सर्वसामान्यांना वंचित असणारी अशी गावे आहेत. आणि माझ्याबद्दल सांगायचे झाले तर, अत्यंत गरीब, सामान्य कुटुंबातील एक सामान्य मुलगा, कष्टकरी आई-वडील आणि त्यांच्या घामानं कसा बसा संसाराचा गाडा चालत असे. घरातील सर्व परिस्थिती डोळ्यासमोर दिसत असूनही नोकरी नसल्यामुळे हताश होऊन बसलेला मुलगा म्हणजे मी, गणेश रमेश मोरे.

परंतु **त्याच काळात राजन राजे (भाई) हे एक आशेचा किरण दिसू लागला आणि ह्या देवमाणसामुळे माझ्या आयुष्याला एक चांगले वळण मिळाले. त्यांनी दिलेल्या नोकरीमुळे मी शहरी भागात नोकरी करून माझा उदरनिर्वाह करत असताना, तेव्हाचा मिळणारा पगार/वेतन हे माझ्या दृष्टीने खूप होते. त्यामुळे मला घराची जबाबदारी घेणे अत्यंत सोपे झाले. तेव्हा माझी गरिबी दूर होऊन माझी स्वप्ने पाहण्याची व आशा-आकांक्षा उंचावल्या गेल्या.**

तसेच माझ्या कुटुंबामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण होत गेले. आई-वडिलांच्या चेहऱ्यावर हसू आले. तसेच घरातील परिस्थिती सुधारू लागल्यामुळे समाजात पण एक होतकरू मुलगा म्हणून मान-सन्मान मिळू लागला. आणि त्याच नोकरीच्या आधारावर मला लग्नाबद्दल विचारू लागले आणि त्यामुळेच अगदी थोड्याफार गाजावाजात मी माझे लग्न करू शकलो.

ह्या सर्व गोष्टींचे श्रेय फक्त आणि फक्त एकाच व्यक्तीला जाते, ती म्हणजे मा. श्री. राजन राजे यांनाच. आज जी पण तुटकी-फुटकी पगारातील नोकरी करतोय, कुटुंबाचा गाडा चालवतोय, ते सुद्धा त्यामुळेच शक्य झाले. कारण बोर्डात लागण्यासाठी लागणारी रक्कम मी जर आत्ता उभी करू शकलो नसतो, तर तेव्हाची काय अवस्था असेल?

त्यामुळे असे माझ्यासारखे हजारो कुटुंबांचा उद्धार करणाऱ्या व्यक्तिमत्त्वाला मी आयुष्यात विसरूच शकत नाही. एवढे उपकार माझ्यावर त्यांनी केले आहेत. मला हे सांगायचे कारण असे आहे की, आज आपण त्याच कंपनीमधील जी अनावस्था ऐकतोय, तेव्हा त्या कृतघ्न कामगारांच्या बुद्धीची कीव येते. यातील काही कामगार असे आहेत की, यांना मुरबाड MIDC मध्ये ८ तास रक्ताचे पाणी करून जेमतेम १५-१६ हजार इतकेच हातात आले असते. म्हणजे यांची लायकी काय होती, याचा त्यांना विसर पडलाय.

असो, मला एवढेच म्हणायचे होते की, ज्यांच्यामुळे चालायला शिकलोय, त्यांना विसरू नये.



**''जरी बाप मेला तरी आपल्याला शासकीय/प्रशासकीय किंवा खाजगी कागदोपत्री अथवा इतर सर्वत्र बापाचे नाव लावल्याशिवाय आपली ओळख पुरेशी होतच नाही. म्हणून ज्यांनी नोकरी दिली, दुनिया दाखवली, लायकीपेक्षा जास्त दिले, त्या बापमाणसाला सुद्धा विसर कसा पडू शकतो?**

एवढे सांगून तूर्तास तरी थांबतो.''

*- गणेश रमेश मोरे*

# जीवनाला कलाटणी देणारा फोटो!

'उद्ध्वस्त माणसाच्या कविता' या २००५ साली प्रसिद्ध झालेल्या माझ्या पहिल्या कवितासंग्रहाच्या प्रस्तावनेत ज्येष्ठ साहित्यिक व विचारवंत डॉ. यशवंत मनोहर म्हणतात, **''माणसाचे बालपण माणसाच्या मनाची मूस निश्चित करते. ही मूसच पुढे जीवनाच्या आकलनाची 'मेथडॉलॉजी' ठरते. डोळ्यात पुढे अनुभवांचे अनेक पाट येऊन मिळतात; परंतु डोळ्यांतील पायाभूत 'व्हिजन'ची स्थापना अबाधित राहते. या 'व्हिजन'ला पुढे अनेक आयाम मिळतात; पण या 'व्हिजन'ला आपल्या 'रुट'शी असलेले नाते तोडता येत नाही. आयुष्यातल्या, त्यातही लहानपणातल्या जखमाच पुढे डोळ्यांच्या भूमिका करीत असतात. पुढे माणूस कुठेही गेला, कुठेही असला तरी त्याचे डोळे झालेल्या या जखमा त्याची साथ सोडीत नाहीत.''**

हे सांगण्याचे कारण असे की, १९८३ साली मी तिसऱ्या वर्गात असतानाचा हा फोटो आहे. सोबत माझी धाकटी बहीण वर्षा आहे. हा केवळ एक फोटो नसून माझ्या मनाची मूस निश्चित करण्यात आणि आयुष्याला अर्थपूर्ण सूर्यदिशा देण्यात त्यातील प्रसंगाची भूमिका खूप महत्त्वाची आहे.

माझे वडील ऑर्डनन्स फॅक्टरी, जवाहरनगर, भंडारा, महाराष्ट्र येथे नुकतेच अकुशल कामगार म्हणून नोकरीला लागले होते. तेथील 'ऑर्डनन्स फॅक्टरी' या सरकारी कंपनीत 'गेस्ट हाऊस' होते. तेथील पाहुण्यांना जेवण वाढण्याचे काम त्यांच्याकडे होते.

त्यावर्षी उन्हाळ्याच्या सुट्ट्यांमध्ये गावाकडील भावंडे आमच्याकडे आली होती. आम्हा सर्वांना आपले कामाचे ठिकाण दाखवण्यासाठी वडील आम्हाला 'गेस्ट हाऊस' येथे घेऊन गेले. ते प्रशस्त गेस्ट हाऊस आणि परिसर पाहून आम्ही भारावून गेलो. तसे निसर्गसौंदर्य आम्ही पहिल्यांदाच पाहत होतो.

तेथे बालपांडे नावाचे एक 'फोरमन' होते. ते फोटोग्राफीचे कामही करायचे. वडिलांनी आम्हा बहिणभावांना 'ऑर्डनन्स फॅक्टरी महाप्रबंधक' (General Manager) ज्या सोफ्यावर बसत असत, त्यावर बसवले आणि बालपांडे साहेबांकडून आमचा फोटो काढून घेतला. तोच हा फोटो आहे.

**'जनरल मॅनेजर यांच्या सोफ्यावर मुलांना बसवून फोटो काढला' ही बातमी महाप्रबंधक एम. एल. दत्ता व त्यांच्या पत्नी मिरा दत्ता यांच्या कानावर गेली. त्यांना ते आवडले नाही. दुसऱ्या दिवशी दत्ता साहेबांनी वडिलांना बोलावून विचारणा केली आणि ''महाप्रबंधकांच्या सोफ्यावर बसवून मुलांचे फोटो काढणे योग्य नाही,'' असे म्हणत ते रागावले. त्यावर वडिलांनी हात जोडले आणि माफी मागत म्हटले, ''सर, गलती हुई। लेकिन यह गलती मैंने जानबूझकर की। मेरा सपना है कि, मेरा बेटा भी बड़ा होकर आप जैसा साहब बनेगा।'' वडिलांच्या या उत्तराने महाप्रबंधक दत्ता साहेबांचे मन विरघळले**



**आणि त्यांना आनंद झाला. त्यांनी हसत हसत वडिलांना शाबासकी दिली आणि तो विषय तिथेच थांबला.**

पुढे, ऑर्डनन्स फॅक्टरी, अंबाझरी (नागपूर) येथे संविधान दिनानिमित्त मला प्रमुख अतिथी म्हणून व्याख्यानाचे निमंत्रण मिळाले. ज्येष्ठ विधीज्ञ ड. शैलेश नारनवरे हे सुद्धा मुख्य वक्ता होते. ऑर्डनन्स फॅक्टरीच्या लोकशाही कामगार युनियनने दि. ३० नोव्हेंबर २०२५ रोजी संविधान दिन समारोहाचे सुंदर आयोजन केले होते. युनियनचे प्रशांत मुनेश्वर, रजनीश देवकाते, शितल अंबादे, सुदर्शन मेश्राम इत्यादी पदाधिकाऱ्यांचे आयोजनात परिश्रम होते. समारोहाला कार्यकारी संचालक एम. के. आर्या व सर्व महाप्रबंधक आर. डी. वर्मा, अरुणांशु प्रामाणिक, कौशल किशोर, राहुल कोमलकर यांच्या उपस्थितीत व्याख्यान देताना मी अभिमानाने हा प्रसंग सांगितला. यावेळी सर्व अधिकारी वर्ग, कामगार युनियनचे नेते, उपस्थित कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबीयांनी टाळ्या वाजवून या प्रसंगाला दाद दिली.

**या समारोहातील माझ्या भाषणाची चित्रफीत जेव्हा मी वडिलांना पाठवली, तेव्हा ते खूप खुश झाले. ''आयुष्यातील सर्वात बेस्ट भाषण!'' असे म्हणत त्यांनी माझे भरभरून कौतुक केले. ती चित्रफीत त्यांनी वारंवार पाहिल्याचे प्रत्यक्ष भेटीत आवर्जून सांगितले होते.**

माझ्या लहानपणच्या प्रत्येक भाषणाला प्रत्यक्ष उपस्थित राहून दाद देणारे, माझ्या भाषणाचे भरभरून कौतुक करणारे माझे वडील आज आमच्यात नाहीत; मात्र लहानपणची ती आठवण माझ्या काळजात कायमचे घर करून राहिली आहे. ही आठवण मला पदोपदी प्रेरणा आणि प्रोत्साहन देत सन्मानाने जगण्याचे बळ देते.

***...डॉ. महेंद्रकुमार मुरलीधर मेश्राम***

प्राचार्य, ऑरेंज सिटी कॉलेज ऑफ सोशल वर्क, नागपूर, महाराष्ट्र. मोबाईल : ९९७५६ ६५८६२

# श्रीगणेशाचं निसर्ग-पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून महत्त्व व गणेशोत्सवाची सद्यस्थिती...गणेश जन्मा, ही तुझी कहाणी!

संत ज्ञानेश्वरांनी ओंकाराच्या स्वरुपात, संत तुकारामांनी....'अकार तो ब्रह्मा, उकार तो विष्णू, मकार महेश जाणियेला', असे म्हणून 'ब्रह्मा-विष्णू-महेश' या तीनही प्रमुख देवतांचं 'गणेश', हे जन्मस्थान असल्याची प्रचिती दिली; तर, समर्थ रामदासांनी... 'गणाधीश जो ईश सर्वगुणांचा', असं मनाच्या श्लोकाच्या शुभारंभालाच म्हणत, श्रीगणेशाचं स्तवन केलयं! श्रीगणेशाचं गुणवर्णन करण्यात प्राचीन काळातील वेद, उपनिषदे, पुराणेही मागे नाहीत.

**हे सगळं असं असलं तरी, या गणेश दैवताचं महत्त्व, निसर्ग-पर्यावरणाच्या दृष्टीकोनातून फार फार आगळंवेगळं व अतिशय महत्त्वाचं आहे! ते असं की, श्रीगणेश दैवत हे, 'माणूस आणि हत्ती' (गज म्हणून गजानन) या दोहोंतून तयार झाल्याची आख्यायिका, खरंतरं समष्ठिच्या हिताच्या दृष्टीनं आपल्याला खूप काही सांगून जातेयं...पण, लक्षात कोण घेतो? श्रीगणेशानं जणू मनुष्य आणि प्राणीमात्रातला, एकप्रकारे 'भेद'चं मिटवून टाकत, सजीवमात्रांचं 'अद्वैत' वा 'एकत्व' पेश केलयं...'माणुसकी आणि भूतदया', यांना जणू एकाच पातळीवर आणलयं... सर्व 'भूतां'मध्ये भगवंताचा 'वास' आहे, याचा प्रखर संदेश दिलायं!**

भारतीय आध्यात्मिक-तत्त्वज्ञानानं यातून, जे अवघ्या सजीवसृष्टीतलं 'एकत्व' दाखवलयं, ते आपण साफ विसरुन गेलेलो आहोत. सरतेशेवटी, कुठलाही 'सजीव'च काय किंवा अगदी 'निर्जीव'सुद्धा काय... एकाच प्रकारच्या मूळ तत्त्वांनी बनलेले असतात...प्रोटॉन्सब, इलेक्ट्रॉन्सब, न्यूट्रॉन्सब, बोसॉन्सब वगैरे वगैरे. फरक फक्त, 'चेतनेच्या पातळी'तलाच (level & flow of consciousness) असतो तेवढाचं!

नोबेल पारितोषिक विजेते जगदीशचंद्र बोस एकदा, 'वनस्पतीदेखील 'सजीव' असतात व त्यांच्यावरही माणसांवर होतो; तसाच, विषाचा परिणाम होतो' हा प्रयोग करुन दाखवण्यासाठी, काचेच्या भांड्यातून त्यांच्या मदतनीसाने आणलेले विष त्यांनी, प्रयोगातील वनस्पतीच्या मुळावर ओतले. मात्र, अपेक्षेप्रमाणे वनस्पतीवर कुठलाही विपरित परिणाम न झाल्याचे पाहून, जगदीशचंद्र बोस गडबडून गेले व प्रयोगासाठी उपस्थित शास्त्रज्ञ त्यांना हसू लागले. पण, क्षणभरच गोंधळून गेलेल्या जगदीशचंद्र बोसांनी, दुसऱ्याच क्षणी तो भांड्यातील विषाचा उरलासुरला द्राव, स्वतः आत्मविश्वासाने पिऊन टाकला व म्हणाले की, 'जर, या विषाचा वनस्पतीवर परिणाम होत नसेल तर, खात्रीने माझ्यावरही होणार नाही'. नंतर कळलं की, त्या सेवकाच्या हातून चुकून विषाच्या आणि पाण्याच्या भांड्यांची अदलाबदल झालेली होती. त्यानंतर, पुन्हा नव्यानं करण्यात आलेला तो प्रयोग, यशस्वीरित्या संपन्न झाला आणि उपस्थित सगळेच शास्त्रज्ञ अचंबित झाले. मुद्दा पुन्हा तोच, 'सजीवसृष्टीप्रतिच्या एकत्वाचा आणि सम्यकभावाचा'... जो, श्रीगणेशाच्या संरचनेतच मुळापासून अंतर्भूत आहे!

औद्योगिक-संस्कृतितील 'कार्बनकेंद्री, रासायनिक-आण्विक प्रदूषणकेंद्री' विकासाचं प्रारुप आणि संवेदनाशून्य चंगळवादी-संस्कृतिचा प्रादुर्भाव, यामुळे आपण उर्वरित सजीवसृष्टीपासून स्वतःला शब्दशः साफ तोडूनमोडून टाकलयं. जेव्हा, आम्ही स्वतःला 'निसर्गप्रेमी' म्हणतो, तेव्हा हेचं निसर्गापासूनच तुटलेपण अधोरेखित होत असतं. त्यामुळेच, आज जगावर निसर्ग-पर्यावरणीय महासंकटं कोसळू लागलीयतं आणि अवघ्या सजीवसृष्टीचं अस्तित्वच, निसर्गातील विघातक-विध्वंसक स्वरुपाच्या मानवी-हस्तक्षेपामुळे गंभीररित्या धोक्यात आलेलं आहे! **जेव्हा जेव्हा, गणराया येतो...तेव्हा तेव्हा तो हा, 'सजीवांच्या एकत्वाचा' महान संदेश घेऊन येत असतो. श्रीगणेश, हे असं दैवत की, ज्याची आपण 'प्राणप्रतिष्ठापना'ही करतो आणि यथावकाश 'विसर्जन'ही! जीवन 'क्षणभंगुर' आहे... 'ते आज आहे, उद्या नाही' हा, 'कर्मस्वातंत्र्य' असलेल्या मानवजातीच्या अहंकाराला-अहंमन्यतेला...नियतीतर्फे दिला गेलेला, सूचक व गर्भित इशारा आहे.** दुसऱ्या अर्थानं, संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरीत वर्णिलेला, 'स्वत्वाचं विसर्जन' (Dissolving Self) करणारा 'सगुण आणि निर्गुण भक्ति'चा प्रत्यय अथवा 'एकोऽहं बहुस्याम्य' असा 'पूर्णमदः पूर्णमिदंः' म्हणजेच, परमात्म्याच्या पूर्णत्वाचं व अनंततत्त्वाचं प्रमाण...एकाचवेळी देणारं, हे अद्भुत दैवत आहे!

...दुर्दैवानं, एकतर बुद्धिजिवीवर्ग, या दैवताची तार्किक व बौद्धिक चिरफाड करण्यात स्वतःला धन्य समजतो... किंवा, 'विघ्नहर्ता' म्हणून अतिश्रद्धाळूपणाच्या प्रभावाखाली सर्वसाधारणपणे इतरेजन, या महन्मंगल दैवताच्या 'निसर्ग-पर्यावरणपूरक महान संदेशा'ची हेळसांड तरी करत रहातात. हे गणेशरुपी अलौकिक दैवत पुजणारी, वनस्पतीपूजन (तुळशीपूजन, वटपौर्णिमा इ.), प्राणीपूजन (बैलपोळा, नागपंचमी इ.) करणारी निसर्ग-पर्यावरणस्नेही 'महन्मंगल मराठी-संस्कृति'ही देखील कालपरत्वे, पर्यावरणासारखीच भयंकर प्रदूषित व्हायला लागलीयं! सार्वजनिक-गणेशोत्सव तर, विकृतीनं भरलेले उघडानागडा धांगडधिंगा व बक्कळ पैसा कमावणारे व्यवसाय बनलेत. पावसाळ्यात उदंड उगवणाऱ्या कुत्र्याच्या छत्र्यांसारखे... सार्वजनिक-गणेशोत्सव गल्लोगल्ली प्रतिवर्षी वाढू लागलेतं; ज्यात, गांभीऱ्याचा वा पावित्र्याचा लवलेशही नसतो. **पूर्वी फक्त श्रीगणेशाच्या विसर्जनाच्या वेळेसच मिरवणूका निघायच्या...आता, आगमनाच्याही निघायला लागल्यात. जगणं चारही बाजुंनी एवढं असुरक्षित, मेटाकुटीचं व दुःखदायक बनल्यानंतरही... या सर्वस्व गमावलेल्या मराठी-तरुणाईला, व्यवस्थेविरोधात 'विद्रोह' करण्याऐवजी; ही अशी, दहीहंडी-गणेशोत्सव, नवरात्रोत्सवासारखी औटघटकेची मौजमजा सुचत असेल, तर ते एक मोठ्ठ आश्चर्यच आहे! कुठून येते ही क्षणिक, उसनी व आत्मघातकी ऊर्जा?**

...हे इतकचं नव्हे तर, निसर्ग-पर्यावरण संरक्षण-संवर्धनाचा संदेश देणाऱ्या, या दैवताचा सण-उत्सव.... आपण प्लॅस्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ति, थर्माकोल व रासायनिक कृत्रिम रंगांचा वापर, गणेशमूर्तिंच्या उंचीची वेडीवाकडी स्पर्धा, हानिकारक ध्वनिप्रदूषण, वर्गणीच्या नांवाखाली गोळा केल्या जात असलेल्या खंडण्या, गुटखा-मावा-तंबाकूच्या अनारोग्यकारक जाहिराती, जुगारासारखे खेळ, मिरवणुकीतील टपोरीगिरी व दारु पिऊन धिंगाणा, अस्वच्छता इ. मुळे उलट सर्वच दृष्टीकोनातून आपण भयंकररित्या 'प्रदूषणकारी' बनवून टाकलायं...ही खरंतर, या श्रीगणेश दैवताशी आपण केलेली 'प्रतारणा'च नव्हे; तर, श्रीगणेशाप्रति केलेला अक्षम्य 'अपराध' व त्याची विटंबना आहे!

...पृष्ठ क्र. १२ वर



**सार्वजनिक-गणेशोत्सव, विकृतीनं भरलेले उघडानागडा धांगडधिंगा व बक्कळ पैसा कमावणारे व्यवसाय बनलेत. पावसाळ्यात उदंड उगवणाऱ्या कुत्र्याच्या/कावळ्याच्या छत्र्यांसारखे...सार्वजनिक-गणेशोत्सव गल्लोगल्ली प्रतिवर्षी वाढू लागलेतं; ज्यात, गांभीऱ्याचा वा पावित्र्याचा लवलेशही नसतो.**

# वॉलमेट कामगार-कर्मचाऱ्यांच्या ऐतिहासिक त्रैवार्षिक कराराच्या पार्श्वभूमीवर, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष मा. श्री. राजन राजे साहेब यांनी कामगार बांधवांसाठी व्यक्त केलेल्या भावना व मार्गदर्शनपर विशेष लेख

जसं युद्धकाळात आपण ''सैनिकहो, तुमच्यासाठी...'' हे भावगर्भ गाणं म्हणतो; त्याच तालावर, त्रैवार्षिक-करारावर सह्या केल्यापश्चात, आज आम्हा सर्वांच्या अंतरी अशाच भावना उसळून येताहेत...म्हणूनच त्या, या शब्दात वर्णायला हव्यात की, ''वॉलमेट-कामगार मित्रहो, तुमच्यासाठी...!!!''

**...प्राप्त परिस्थितीत झालेला, हा एक असा पगार / बोनस व इतर सेवाशर्तींमध्ये वृद्धी करणारा करार आहे की, ज्यामुळे माझ्या वॉलमेट-कामगारांचं, स्वप्नवत वाटावं; असं आर्थिक-उन्नयन नजिकच्या भविष्यात घडून येणार आहे.**

**आपल्या कामगार संघटनेचे युनिट-अध्यक्ष 'कमलेश कोल्हे' यांनी, सदर कराराबाबत, जे काही शब्दांकन केलंय... ते इतकं मार्मिक व प्रत्ययकारी आहे की, त्यातच कराराचं मर्म, सारांशाने व पूर्ण प्रभावाने आलंय...ते शब्दांकन खालीलप्रमाणे,**

**''आजपासून तीन वर्षांपूर्वी अनेक वर्षांचा प्रदीर्घ अनुभव असलेल्या कामगाराचा पगार, ज्या पातळीवर होता, त्या तुलनेत केवळ दोन करारांच्या कालावधीतच...अनेक कामगारांच्या पगारात अंदाजे १००% पर्यंत; तर, काही कामगारांच्या बाबतीत १००% पेक्षाही अधिक वाढ (म्हणजे दुप्पटीहून अधिक पगार) करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणेच, बहुतांश कामगारांचे 'सहा अंकी बोनस'चे स्वप्न...या कराराद्वारे पूर्णत्वास येत आहे, म्हणूनच या कराराचे महत्त्व, केवळ आज मिळालेल्या वाढीपुरते मर्यादित नसून, मागील दोन करारांमधून कामगारांच्या वेतनामध्ये झालेली एकूण भरीव वाढ, हे आहे व तिचं त्याची खरी ओळख आहे!''**

गेल्या कराराप्रसंगी, आपण आपल्यालाच, सर्वांनी मिळून (''मिळून सारे जण'') दिलेलं अभिवचन...म्हणजे, ''किमान सहा आकडी अथवा एक लाखाहून अधिकचा बोनस'', हे होय! हे अभिवचन, अभेद्य कामगार-एकजुटीच्या बळावर, आश्चर्यकारकरित्या या कराराच्या कालावधीतच पूर्णत्वास जातंय...आपल्यापैकी प्रत्येकाने उरी बाळगलेलं हे स्वप्न, अनेक कामगारांच्या (एकूण १५२ पैकी अंदाजे १३० कामगारांच्या) बाबतीत साकार होणार, हे विशेष!

**...गेल्या त्रैवार्षिक-करारातील रु.१५,०००/- (रु. पंधरा हजार) पगारवाढ व या कराराद्वारे होऊ घातलेली रु.२१,०००/- (रु. एकवीस हजार) पगारवाढ मिळून दोन करारांद्वारे ६ वर्षात एकूण होणारी पगारवाढ रु.३६,०००/- (रु. छत्तीस हजार) एवढी भव्यदिव्य होय!**



...मुख्य मुद्दा हा की, '४ काळ्या कामगार-संहितां'च्या कामगारविरोधी प्रतिकूल प्रवाहाविरुद्ध पोहून जात...अंदाजे दिडशे कायम-कामगार काम करत असलेल्या, आपल्या 'वॉलमेट-कंपनी'तील, एकूण एक सगळ्या 'कंत्राटी-कामगारां'ना वर्षानुवर्षाच्या 'गुलामी'तून (Neo-Slavery...Socio-economic Participatory Exclusion) बाहेर काढून 'कायम' करणारी व त्यांच्या आर्थिक-उन्नयनाची मुहूर्तमेढ रोवणारी... ही 'धर्मराज्य-परंपरे'तील क्रांतिकारक व लोकविलक्षण 'वॉलमेट करार-मालिका' आहे!

**त्रैवार्षिक-करारातील महत्त्वपूर्ण तपशील व मुद्दे.**

- या त्रैवार्षिक पगारवाढीच्या करारान्वये, कायम-कामगारांची'थेट पगारवाढ' (C.T.C. वगैरे सारख्या, अलिकडच्या काळातील ''व्यवस्थापकीय फसव्या संकल्पने''नुसार नव्हे!) रु.२१,०००/- (रु. एकवीस हजार)....
- रु.२१,०००/- या त्रैवार्षिक पगारवाढीचं प्रतिवर्ष-वाटप अनुक्रमे ५०% : २५% : २५%

एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ रु.१०,५००/-
एप्रिल २०२७ ते मार्च २०२८ रु.५,२५०/-
एप्रिल २०२८ ते मार्च २०२९ रु.५,२५०/-

यामधील, ७०% पगारवाढ बेसिक पगारामध्ये (PF-Base) व उर्वरित ३०% इतर अलाऊंसेसमध्ये...!!!(व्यवस्थापकीय परिभाषेतील C.T.C. पगारवाढ अंदाजे, रु.२३,४७२/- हूनही अधिक)

- एप्रिल २०२६ मध्ये 'कायम' करण्यात आलेल्या कंत्राटी-कामगारांसाठीची पगारवाढ रु.१६,०००/-

एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ रु.८,०००/-
एप्रिल २०२७ ते मार्च २०२८ रु.४,०००/-
एप्रिल २०२८ ते मार्च २०२९ रु.४,०००/-

यामधीलही, ७०% पगारवाढ 'बेसिक-पगारा'मध्ये (PF-Base) आणि ३०% पगारवाढ इतर अलाऊंसेसमध्ये....

- बोनस / सानुग्रह-अनुदान : एकूण पगारावर (Gross Earnings) १५%... त्यामधील, १०% दिवाळीमध्ये आणि ५% मार्चमध्ये (व्हेरिएबल...KPI)
- निवृत्तीपर लाभ (Retirement Benefit) : रु.३५,०००/- वरून रु.५०,०००/- पर्यंत (रु.१५,००० ची वाढ)
- जनरल शिफ्टची वेळ अर्ध्या तासाने कमी करण्यात आलेली आहे.

आधीची वेळ स. ८.३० ते सं. ५.३०
आताची, सुधारित वेळ १ ऑक्टोबरपासून : स. ८.३० ते सं. ५.००

- महिन्याच्या पाचव्या 'शनिवारी सुटी'चा लाभ (पाचव्या शनिवारी, महिना अखेरीस कामाचा व्याप असल्याने, ज्या महिन्यात पाच शनिवार येतील; त्या महिन्यातल्या 'चौथ्या शनिवारी' सुटी ठेवण्यात आलीय)
- मृत्युपश्चात लाभ : युनियन-सभासद असलेल्या कामगाराचा दुर्दैवाने मृत्यू झाल्यास, त्या कामगाराच्या अधिकृत वारसास, प्रत्येक युनियन-सभासद असलेल्या कामगाराच्या वेतनामधून...एका दिवसाचा (Gross) पगार कापून, प्रासंगिक 'आर्थिक-मदत' देण्याची तरतूद, या करारात करण्यात आलेली आहे.
- खास तरतूद : युनियन-सभासद असलेले; पण, कायम नसलेले उर्वरित सात कंत्राटी-कामगार वर्ष-२०२७ एप्रिलमध्ये 'कायम' होणार आणि त्यांची स्वतंत्रपणे होणारी पगारवाढ रु.१२,०००/-

एप्रिल २०२६ ते मार्च २०२७ रु.४,०००/-
एप्रिल २०२७ ते मार्च २०२८ रु.४,०००/-
एप्रिल २०२८ ते मार्च २०२९ रु.४०००/-

**मित्रहो, व्यवस्थापकीय मंडळींनी, काही अपरिहार्य कारणास्तव, सह्या झाल्यानंतर सर्वसाधारणपणे लागलीच कंपनीत होणारा 'आनंदोत्सव' थोडा पुढे ढकलण्याची व तो कंपनीबाहेर साजरा करण्याची केलेली विनंती...मान्य करावी लागतेय. त्यासंदर्भात, योग्य ठिकाण निवडून, कुठल्यातरी सुटीच्या दिवशी लवकरच...तो विविध कंपन्यांमधील आपल्या 'धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघा'च्या (DKKM) निवडक कमिटी-सभासद व कार्यकर्त्यांसोबत आपण साजरा करुया, धन्यवाद...जय हो!**

***...राजन राजे,***

(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष व धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ)

(वि. सू. : मित्रहो, ''मंझिल अभी और भी बाकी है...बरंच काही साध्य झालंय, बरंच काही साध्य व्हायचं राहिलंय! ''कराराचं कवित्व, आज न् उद्या संपेल; तेव्हा, जरा येऊ घातलेल्या भविष्याकडे नजर टाकणं खूपच गरजेचं बनेल...एक इंग्रजी म्हण आहे, 'Those who sweat in peace, never have to bleed in war''! ''यश मिळवण्याहूनही यश टिकवणं कठीण असतं''... आणि, कामगारांसाठी तर, सध्याच्या काळात दोन्ही गोष्टी जवळपास अशक्यप्राय बनत चालल्यात, हे नीट ध्यानात ठेवा. आपल्या 'वॉलमेट' कंपनीतल्या कामगारांची अवस्था, आताच्या 'सुल्झर पंप्स' कंपनीतल्या कामगारांसारखी होऊ द्यायची नसेल; तर, 'कामगार' म्हणून तुम्हाला खूपच प्रावधानं बाळगावी लागतील. ''समज, सावधानता आणि सजगता'', हीच ती त्रिसूत्री होय, ज्याची मशागत आपापल्या मनांमध्ये व अंतःकरणात काळजीपूर्वक करावी लागेल...तुमच्या 'मानसिक-विकासा'ला मागे टाकून तुमचा 'आर्थिक-विकास' सुसाट पुढे निघून गेला; तर, भांडवली-व्यवस्थेतील 'भौतिक-विकृती', आपलं जगणं पूर्णतया घेरुन टाकते व अल्पावधीत झालेली आपली भौतिक-समृद्धीच, आपल्या अंगावर कोसळायला लागते...

तेव्हा, लक्षात ठेवा, ''सत्य, न्याय, प्रेम, निती आणि निष्ठा'', या 'कामगारधर्मा'च्या पंचःसुत्रीचा अंगिकारच, भविष्यात तुमच्या संरक्षणाची 'ढाल' बनून राहील; अन्यथा, ''जिथे आपण सुगंधी 'फुले' वेचली; तिथे कामगारांना शेणाच्या 'गोवऱ्या' वेचायची वेळ येते'', हे कधिही विसरु नका!)

***कामगार बांधवांसाठी लिहिलेल्या वरील संदेशाला मिळालेल्या उत्स्फूर्त, भावनिक आणि कृतज्ञतापूर्ण प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे :***

Online

नमस्कार मित्रांनो,

आजचा संदेश वाचून सर्व कामगारांमध्ये आनंदाची लाट पसरली असेल, यात शंका नाही.

गुरुपौर्णिमेच्या दिवशी मा. राजे साहेबांसोबत कराराविषयी चर्चा करताना साहेबांनी सांगितले होते की, ''अर्जुनाला ज्याप्रमाणे फक्त माशाचा डोळा दिसतो, त्याचप्रमाणे मला सध्या फक्त तुमचा कराररच दिसतो.''

खरोखरच, साहेबांनी सांगितल्याप्रमाणे कधी अर्जुनाप्रमाणे हातात शस्त्र घेऊन, तर कधी श्रीकृष्णाप्रमाणे हातात रथाची दोर सांभाळत, कराराच्या मार्गात आलेले अनेक अभेद्य चक्रव्यूह भेदून साहेबांनी यश संपादन केले आणि या यशाचे फळ कराराच्या रूपाने आमच्या पदरात टाकले.

साहेबांनी हा करार यशस्वीपणे संपन्न करून दाखवला. त्याबद्दल साहेबांचे मानावे तेवढे आभार कमीच आहेत.

तरी, मी सर्व कामगारांच्या वतीने मा. राजन राजे साहेब आणि धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे सर्व पदाधिकारी यांचे मनःपूर्वक आभार मानतो.

राजू भोईर व सर्व कामगार बंधूंनो,

वालमेट परिवाराकडून मनःपूर्वक धन्यवाद!

कलियुगातील कृष्णनीती

कलियुगात जर सामान्यांना तारायचे असेल, तर फक्त एकच नीती आहे-ती म्हणजे कृष्णनीती!

माननीय श्री. राजन राजे साहेबांनी या विषयाचा सखोल अभ्यास करून, आमच्यासारख्या असंख्य कामगारांच्या पदरी घवघवीत यशाचे दान टाकले आहे. त्याबद्दल समस्त वालमेट कामगार त्यांचे सदैव ऋणी राहतील.

आम्हा कामगारांना आपल्या रूपाने श्रीकृष्णासम सारथी लाभला, हे आमचे अहोभाग्यच आहे!

संपूर्ण धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाला वालमेटच्या सर्व कामगार बांधवांकडून मनःपूर्वक धन्यवाद!

आपली अशीच साथ सदैव आम्हाला लाभत राहो, हीच मनःपूर्वक इच्छा.

धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाला मानाचा मुजरा!

आपला एक कर्मचारी,

***– चंद्रकांत बामा पाटील***

Type a message

Online

कामगार हृदयसम्राट मा. श्री. राजन राजे साहेबांना मानाचा मुजरा!

वालमेट कामगारांच्या हक्कासाठी, न्यायासाठी आणि उज्ज्वल भविष्यासाठी सदैव खंबीरपणे उभे राहणारे कामगार हृदयसम्राट मा. राजन राजे साहेब यांनी आपल्या अथांग अभ्यासपूर्ण मार्गदर्शनातून वालमेट कामगारांचा द्वितीय पगारवाढीचा करार यशस्वी करून दाखवला!

हा केवळ करार नाही, तर वालमेट कामगारांचा विश्वास, एकजूट आणि संघर्षाचा ऐतिहासिक विजय आहे!

साहेब, आपल्या मार्गदर्शनामुळे हा करार कामगारांच्या स्मरणात सुवर्णाक्षरांनी लिहिला गेला आहे.

मा. राजन राजे साहेब, आम्ही सर्व वालमेट कामगार सदैव आपले ऋणी आहोत. आपल्या नेतृत्वाला आणि मार्गदर्शनाला मनःपूर्वक सलाम व कोटी कोटी धन्यवाद!

एकजूट कामगारांची

मार्गदर्शन राजे साहेबांचे

आणि विजय वालमेट कामगारांचा!

विजय असो! विजय असो!! विजय असो!!!

धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ

एकजूट - संघर्ष - विजय!

***– उमाकांत ठाकरे (वॉलमेट)***

Type a message

Online

कामगार हृदयसम्राट श्री. राजन राजे साहेब,

अध्यक्ष, धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघ

आणि सर्व महासंघ पदाधिकारी,

सस्नेह नमस्कार.

आपल्या धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाच्या खंबीर नेतृत्वाखाली आणि कुशल मार्गदर्शनामुळे आपला बहुप्रतीक्षित पगारवाढीचा करार अत्यंत यशस्वीपणे संपन्न झाला आहे. याबद्दल सर्व कामगार बांधवांच्या वतीने आपले आणि संपूर्ण संघटनेचे मनःपूर्वक आभार!

कामगारांच्या हितासाठी आणि हक्कांसाठी आपण सर्वांनी घेतलेले कष्ट, दाखवलेली एकजूट आणि व्यवस्थापनासोबत अत्यंत कुशलतेने केलेली चर्चा यामुळेच आज आपल्याला हा ऐतिहासिक आणि सन्मानजनक पगारवाढीचा निर्णय मिळाला आहे.

साहेब, आपल्या नेतृत्वाने आणि महासंघाच्या टीमने नेहमीप्रमाणे आमचा विश्वास सार्थ ठरवला आहे.

आपले हे खंबीर नेतृत्व आणि महासंघाची साथ अशीच पुढेही आमच्या पाठीशी राहील, हा आम्हाला पूर्ण विश्वास आहे. आम्ही सर्व कामगार नेहमी आपल्या आणि महासंघासोबत एकजुटीने उभे राहू.

धन्यवाद!

आपले नम्र,

***– मंगेश महाजन***

सर्व वालमेट कामगार व कर्मचारी बांधव

Type a message

Online

अविश्वसनीय व ऐतिहासिक करार... सर्वांचे मनःपूर्वक अभिनंदन!

धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे अध्यक्ष आदरणीय श्री. राजन राजे साहेब यांच्या धडाडीच्या आणि कणखर नेतृत्वाखाली वालमेट (Walmet) कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी ठी.२१,०००/- ची ऐतिहासिक त्रिवार्षिक पगारवाढ मंजूर झाली आहे. अलीकडच्या काळात अशी भरघोस पगारवाढ क्वचितच कुठे झाली असेल!

या ऐतिहासिक यशामध्ये मोलाचे योगदान देणारे महासंघाचे- महासचिव : श्री. महेशसिंग ठाकूर, उपाध्यक्ष : श्री. रमाकांत नेवरेकर, सचिव : श्री. समीर चव्हाण आणि वालमेटची संपूर्ण कमिटी

या सर्वांचे उत्तम नियोजन आणि अथांग परिश्रमांबद्दल हार्दिक अभिनंदन!

तसेच, या हक्काच्या लढ्यात खंबीरपणे पाठीशी राहणाऱ्या सर्व वालमेट कामगार बांधवांचेही मनःपूर्वक अभिनंदन! राजे साहेबांचे हे सक्षम नेतृत्व कामगारांच्या हितासाठी नवनवे इतिहास घडवत राहो, याच सदिच्छा!

– शुभेच्छुक

***समस्त कामगार, इंडिकॉन न्यूमॅटिक टूल कंपनी, रबाळे, नवी मुंबई***

Type a message

Online

कृतज्ञता आणि अभिमानाचा प्रवास

धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष, माननीय राजन राजे साहेब यांच्या संपर्कात येणे हा आमच्यासाठी केवळ एक योगायोग नसून, जणू काही दैवी आदेशच असावा, अशी आमची मनापासून भावना आहे. त्यांच्या विचारांनी आणि मार्गदर्शनाने प्रेरित होऊन आम्ही या संघटनेशी जोडले गेलो.

आपल्या सर्वांच्या मार्गदर्शनाखाली २०२३ साली पहिला करार आणि आता २०२६ साली दुसरा करार यशस्वीपणे करण्यात सहभागी होता आले, ही आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची आणि समाधानाची बाब आहे.

या यशामध्ये आमचा वाटा कितीही छोटा असला, तरी तो खारीचा वाटा असो किंवा सक्रिय सहभागाऱ्या प्रक्रियेत योगदान देता आले, यामुळे आजपर्यंतचे सर्वात मोठे मानसिक समाधान आम्हाला मिळाले आहे. आणि एक गोष्ट प्रकर्षाने लक्षात आली, आपल्याला कमिटीमध्ये राहण्यापेक्षा युनिटीमध्ये राहण्याची अधिक गरज आहे.

या संपूर्ण प्रवासात संघटनेचे उपाध्यक्ष माननीय रमाकांतजी नेवरेकर साहेब, महासचिव माननीय महेशसिंग ठाकूर साहेब आणि सचिव माननीय समीर चव्हाण साहेब यांच्या सान्निध्यात राहण्याची आणि त्यांच्या मार्गदर्शनातून शिकण्याची संधी मिळाली.

त्यांच्या विचारांनी, संघर्षाच्या भूमिकेने आणि कणखर नेतृत्वाने आमच्यामध्येही एक वेगळा कणखरपणा, आत्मविश्वास आणि लढण्याची जिद्द निर्माण झाली.

याच कणखरपणाच्या बळावर आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करून आज हे भरघोस पगारवाढीचे यश मिळवू शकलो, याचा आम्हाला मनापासून आनंद आणि अभिमान आहे.

या संपूर्ण प्रवासात आम्हाला मार्गदर्शन, प्रेरणा, विश्वास आणि साथ देणाऱ्या राजे साहेबांसह संघटनेतील सर्व ज्येष्ठ पदाधिकारी, सहकारी आणि प्रत्येक कामगार बांधवांचे मनःपूर्वक आभार व धन्यवाद!

आपले आशीर्वाद, मार्गदर्शन आणि सहकार्य यापुढेही असेच लाभत राहो, संघटनेची एकजूट अधिक मजबूत होत राहो आणि कामगारांच्या हक्कांसाठी आपण सर्वजण अशीच ताकदीने एकत्र उभे राहो, हीच मनापासून इच्छा!

एकजूट संघर्ष विजय!

धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचा विजय असो!

– ***लोटण येलवे***
वॉलमेट कमिटी सदस्य

Type a message

Online

साहेब, तुमच्या कामाला आणि तुमच्या कार्याला मी अगदी मनापासून आपणास सॅल्यूट करतो....

वॉलमेटच्या ऐतिहासिक कराराबद्दल मनःपूर्वक अभिनंदन व आभार!

Online

कामगारांच्या हितासाठी रुपये २१,००० पर्यंतची थेट पगारवाढ, बोनसवाढ, कंत्राटी कामगारांना कायम करण्याची तरतूद, कामाच्या वेळेत कपात व इतर महत्त्वपूर्ण लाभ मिळवून दिल्याबद्दल धर्मराज्य कामगार-कर्मचारी महासंघाचे संस्थापक मा. राजनभाई राजे साहेब, आपले आणि आपल्या संपूर्ण टीमचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार!

कामगारांची एकजूट, संघटनेचे योग्य नेतृत्व आणि व्यवस्थापनाचे सकारात्मक सहकार्य यामुळे हा उल्लेखनीय करार शक्य झाला.

कामगारांची एकजूट कायम राहो आणि सर्वांच्या प्रगतीचा मार्ग अधिक भक्कम होवो!

"साहेब, आमची साथ तुम्हाला कायम राहील."

– ***रुपेश रटाटे*** (रोहा)

Type a message

Online

राजे साहेब..

आपलं मनःपूर्वक अभिनंदन!

खरंच साहेब.. आज-काल सरकारच्या नाकर्तेपणामुळे महाराष्ट्रातील मरणासन्न अवस्थेत असलेली संपूर्ण उद्योग नगरी नष्ट होत असताना प्रदीर्घ काळानंतर कामगार हितोपयोगी असा भरीव पगार वाढीचा करार आज आपल्या युनियनच्या माध्यमातून होतोय हे पाहून खूपच आनंद वाटला..

सध्याच्या प्रतिकूल परिस्थितीत अजूनही कामगारांच्या हितासाठी आपण धन दांडग्या मालकांच्या त्याचबरोबर वेळप्रसंगी कुचकामी शासनाच्या विरोधात नेटाने लढा लढत असता याचं खरंच आम्हाला कौतुक वाटतं. आपल्या या स्तुत्य कार्यप्रणालीस आमचा मानाचा मुजरा.! धन्यवाद.!!

...***शैलेश सावंत*** (माजी नगरसेवक व युनियन-पदाधिकारी WG Forge कंपनी)

Type a message

Online

नमस्कार साहेब

धर्मराज्य कामगार कर्मचारी महासंघातर्फे valmet कंपनीचा त्रैवार्षिक पगारवाढ व सुखसुविधा असा आनंददायी करार संपन्न झाला.

करारसंपन्न झाल्याची बातमी, करारावरसह्यांची बातमी, करार विषयीचा गीस, नंतर दोन दिवसांपूर्वी पगाराची स्लिप आणि आज वाढीव पगार जमा झाल्याचा msg बघायला मिळाला.

अगोदर चिंतेत असणारा कामगार वरील क्रमाने त्याचा चेहरा आनंदित, प्रसन्न होत असताना पहिला.

हे सर्व आपल्या नेतृत्व, अनमोल मार्गदर्शन, संघर्ष - समज अशी समतोल भूमिका आणि आपल्या सहकाऱ्यांची मेहनत यामुळे शक्य झाले आहे.

अशीच प्रगती होत राहील यात तिळमात्र शंका नाही.

मी, साहेब आपले आणि महासंघाचे पदाधिकारी तसेच संयमी एकजूट कामगारांचे मनःपुर्वक अभिनंदन करून आभार मानतो.

धन्यवाद

– ***कामगार*** valmet

Type a message

# हिंदू संस्कृतीच्या नावाखाली हा वाढता भपका, गोंगाट आणि उथळपणा नेमका कुठून आला?




- डीजे हा हिंदू धर्माचा भाग केव्हापासून झाला?
- कानाचे पडदे फाटणारे डॉल्बी लावून ध्वनी प्रदूषण करणे, यालाच हिंदू संस्कृती म्हणतात काय?
- वाहतुकीला अडथळा करणारे कोणत्याही हिंदू धार्मिक उत्सवाचे मंडप घालावेत, हे हिंदू धर्मातल्या कुठल्या धर्मग्रंथात लिहिलेले आहे?
- आगमन व विसर्जनाच्या मिरवणुकीत वाहतूक कोंडी करणे, ही हिंदू संस्कृती आहे?
- अशा मिरवणुकांमधून दारू पिऊन अचकट-विचकट अंगविक्षेप करत नाच करणे, ही हिंदू संस्कृती आहे काय?
- देवाधर्माच्या नावाखाली केलेल्या सण-उत्सवांमध्ये उत्तान नृत्य करणाऱ्या पोरी नाचवणे, हा हिंदू धर्म आहे काय?
- म्हणजे हिंदू धर्म एवढा थिल्लर, उथळ आणि उठवळ आहे काय?
- हे सगळे प्रकार करणारे हिंदुधर्माभिमानी, हिंदुत्ववादी हिंदू धर्माला बदनाम करतात की जनतेला त्रास देणाऱ्या या कार्यक्रमांची चिकित्सा करणारे बापटसारखे नास्तिक हिंदू धर्माला बदनाम करतात?
- अंधभक्तांनो, तुमची डोकी ठिकाणावर केव्हा येणार?
- तुमच्या घरातले कोणी आंधळे, पांगळे, लुळे, बहिरे होतील आणि मरतील, तेव्हाच तुम्हाला जाग येणार काय?
- विचार तर कराल...? ...***जगदीश काबरे (JK)***

# आयत्या पिठावर रेघोट्या मारण्यात पटाईत - भाजप-संघ

१०० वर्षं झाली. आता पूर्ण हिशोब बघा

**१. स्वातंत्र्याच्या लढाईत कोण होतं?**

काँग्रेस, समाजवादी, कम्युनिस्ट - जेलमध्ये गेले, लाठी खाल्ली RSS, हिंदू महासभा, जनसंघ - १९४२ ''भारत छोडो'' पासून लांब १०० वर्षात स्वातंत्र्य आंदोलनाचा एकही केस नाही.

**२. राम मंदिराची लढाई कोणी लढली?**

कोर्टात उभे होते: राम लला, निर्मोही अखाडा, सुन्नी वक्फ बोर्ड वकील होते: परासरण, वैद्यनाथन, राजीव धवन या यादीत RSS आहे का? BJP आहे का? नाही.

**३. कुलूप कोणी उघडलं? रस्ता कोणी केला?**

१९४९ - बाबरीत मूर्ती ठेवल्या - नेहरू सरकार

१९८६ - बाबरीची कुलूपं उघडली गेली - राजीव सरकार

१९८९ - शिलान्यासाची परवानगी - राजीव सरकार

१९९२ - VHP चं आंदोलन

पण तरीही RSS/BJP कोर्टात पक्षकार झाले नाहीत.

**४. निकाल कोणाचा होता?**

९ नोव्हेंबर २०१९ - सुप्रीम कोर्टाचा निकाल.

जमीन मिळाली: राम लला ला

या निकालात RSS/BJP चं नाव आहे का? नाही.

**५. मग श्रेय कोण घेतंय?**

निकालाच्या ५ वर्षांनी २०२४ ला प्राण-प्रतिष्ठा आणि तेव्हापासून भाषणं: ''आम्हीच मंदिर बांधलं, आमच्यामुळेच खरी आजादी मिळाली''

आता त्या प्रश्नांची उत्तरं पण ऐका

लढाई कोणी केली?

उत्तर: राम लला, निर्मोही अखाडा, वक्फ बोर्ड आणि त्यांचे वकील

कुलूप कोणी उघडलं?

उत्तर: १९८६ मध्ये राजीव गांधींच्या सरकारने कोर्टाच्या आदेशाने वकील कोणी नेमले?

उत्तर: हिंदू आणि मुस्लिम दोन्ही पक्षांनी स्वतःच्या खर्चाने.

RSS/BJP ने खर्च केला नाही

**खर्च कोणी केला?**

उत्तर: ७० वर्षे केस लढणाऱ्या सामान्य लोकांनी, ट्रस्टने, देणगीदारांनी खर्च केला. RSS व भाजप यांनी खर्च केला नाही

**आणि फीत कोण कापतंय?**

उत्तर: ज्यांचा वरील ४ पैकी कुठल्याच गोष्टीत हात नव्हता ते

**निष्कर्ष:**

स्वातंत्र्य = दुसऱ्यांचं बलिदान

राम मंदिराची लढाई = दुसऱ्यांची

पाया = नेहरू-राजीव यांचा

खर्च = जनतेचा

श्रेयाची लढाई = यांची

१०० वर्षात जेल नाही, फाशी नाही, पक्षकार नाही, वकील नाही, पैसा नाही.

पण फोटो, भाषणं आणि चढा लुटण्यात मात्र नंबर १. *(समाजमाध्यमातून साभार...)*

---

## ...गणेश जन्मा, ही तुझी कहाणी! ...पृष्ठ क्र. ८ वरुन

या बाबी आता एवढ्या थराला गेल्यात की, सार्वजनिक-गणेशोत्सवांचं करायचं तरी काय, अशी वेळ येऊ घातलीयं.

**...भांडवली-व्यवस्थेचे 'दलाल' असलेल्या व बिल्डर-लॉबीच्या आर्थिक-हितसंबंधांचे 'रखवालदार' असलेल्या घराणेबाज प्रस्थापित राजकारण्यांनी... लो. टिळकांच्या वा प्रबोधनकार ठाकरेंच्या, मूळ प्रबोधनाच्या प्रेरणेविरोधात जाऊन; भोळसट सामान्य मराठी-माणसांना, या गणेशोत्सवासारख्या सार्वजनिक सण-उत्सवांमधून 'अफूची मात्रा' पाजलीय आजवर. त्यातून, एकप्रकारे त्यांना किंकर्तव्यमूढ करणारी घातकी 'ग्लानी'च महाराष्ट्रभरात पसरवलीय! त्यामुळे, आपल्या हक्काच्या महाराष्ट्रातून, 'स्मार्ट' नसलेल्या साध्याभोळ्या सामान्य मराठी-माणसांची भयंकर लूटमार चाललीय... दिवसेंदिवस अधिकाधिक महाग होत जाणाऱ्या 'स्मार्ट-शहरां'मधून, त्यांची टप्प्याटप्प्याने हकालपट्टी चाललीयं...जी अफूच्या ग्लानीमुळे त्यांची त्यांनाच कळणं कर्मकठीण!** जळजळीत वास्तवापासून दूर दूर नेणारे, हे असे उत्सवी-कार्यक्रम...आपल्या जगण्याचं धगधगतं वास्तव, सर्वसामान्यांना क्षणकाळ भुलायला व 'झोपाळ्यावाचून झुलायला लावतात!' ...तेवढी तेवढी, संत्रस्त-संभ्रमित झालेली जनता, जगण्याच्या मूलभूत प्रश्नांपासून व व्यवस्थेविरोधात 'विद्रोह' करण्यापासून, पराङ्मुख होत जाते... अशा सार्वजनिक सण-उत्सवांना, बड्या बड्या सेलेब्रिटींच्या उपस्थितीचं प्रयोजन, मूलतः तेच तर असत. मी स्वतः व्यक्तिशः, लालबागच्या राजासमोर अनेक कामगारांच्या उपस्थितीत, 'हे नवसाला पावणाऱ्या लालबागच्या राजा, तू 'कंत्राटी-कामगार पद्धती'चं निर्मूलन कर... महाराष्ट्रातल्या मराठी-कामगारांना गुलामगिरी व नव-अस्पृश्यतेत ढकलणाऱ्या या 'कंत्राटी-कुप्रथे'चं, तुझ्या विसर्जनासोबतच विसर्जन कर', असा सलग तीन वर्षे, अगदी जाहीररित्या नवस बोलून झाला; पण, आमचा लालबागचा गणराया काही नवसाला पावायला राजी झाला नाही तो नाहीच! उलटपक्षी, उत्तरोत्तर 'कंत्राटी-कामगार पद्धत', महाराष्ट्रभरात बेफाम पसरत गेली; तरी कामगारांच्या डोक्यात प्रकाश पडेल तर शपथ! आम्ही हातपाय न हलवता, संघर्ष न करता...नुसतेच ठोंब्यासारखे, कुठल्या ईश्वरी अवताराची अथवा कृपेची वाट पहात राहीलो; तर, कुठलंही दैवत, कसं काय कुणाला पावेल? इंग्रजीत एक अर्थपूर्ण म्हण आहे 'God helps those, who help themselves!' कंठशोष करुन बेंबीच्या देठापासून तडफफडून आम्ही सांगत आलोय, महाराष्ट्रभरातल्या तमाम तरुण मराठी-कामगारांना की, 'तारुण्य संघर्षात गुंतवलं नाहीत; तर, म्हातारपणी लाचारीचा सामना करावा लागतो'... पण ऐकतो कोण...???

**थोडक्यात, बुद्धीदात्या गणपतीच्या दंतकथेनं, महाराष्ट्राला असं काही सुविचाराचं अथवा बुद्धीचं लेणं दिलं नाहीच; उलट उरलीसुरली तार्किक मराठी बुद्धी, प्रत्येक गणपती मुर्तिच्या विसर्जनासोबतच उत्तरोत्तर हळूहळू विसर्जित होत गेलीय... आणि, म्हणूनच, महाराष्ट्रात जसजशी घरोघरची आणि भ्रष्ट-राजकारण्यांच्या प्रचंड देणग्यांमधून चालणाऱ्या सार्वजनिक-मंडळांच्या गणपतींची संख्या...वर्षागणिक वाढत चाललीय (हल्ली, माघी गणपतींचं खूळ बेसुमार वाढल्यानं, ती संख्या अधिकच वेगाने वाढतेय); तसतशी, सामान्य मराठीजनांची दुर्दशा वाढत चाललीय... बेफाम महाग होत चाललेल्या शहरं-उपनगरांतील, आम मराठी-जगण्याच्या समस्या उग्र होत चालल्यात!** अदानी-अंबानींसारखे भांडवलदार आणि सचिन तेंडुलकर/अमिताभ बच्चनसारखे त्यांचे खासमखास 'भिडू'...जाणिवपूर्वक समाजाला 'लालबागचा राजा' जागृत-दैवत वगैरे असल्याच्या भूलथापात रोज नव्याने अडकवतात. भारताचे 'व्होटचोर व राममंदिर नोटचोर चौकीदार' तर, 'मस्तक हत्तीचं आणि शरीर मनुष्याचं असलेला श्रीगणेश; म्हणजे, भारतातला पहिलावहिला प्लॅस्टिक-सर्जरीचा चमत्कार' म्हणून त्याचे पुराणकालीन गोडवे गातात व भ्रामक-ढोंगी धार्मिकतेत भोळसट जनतेला दांभिक धार्मिकतेत अलगद अडकवताना... 'सत्य, प्रेम, न्याय, निती' या जातिवंत धार्मिकतेच्या चतुःसुत्रीपासून, तिला दूर दूर नेऊ पहातात व त्यातूनच, आपलं बदमाषी-गुन्हेगारीनं भरलेलं राजकारण बेमालूम साधतात.

...आमचे संत तुकाराम, रामदास, तुकडोजी महाराज, गाडगेबाबांसारखे जाज्वल्य संत...शाब्दिक-आसूड ओढून समाजाला जागं करत होते. 'संत आणि सांत्वन', या परस्परविरोधी बाबी असताना; आज महाराष्ट्रभर पसरलेले धर्मसंप्रदायी बोगस संत, 'सांत्वनाचं 'मायाजाल व महाजाल' अभागी भक्तगणांवर पसरवून, समाजाला दैवाधीन षंढ-थंड बनवत नेतात...त्यातून, अन्याय-अत्याचाराविरुद्ध 'विद्रोही बंड' करण्याची, भांडवली-व्यवस्थेला त्रासदायक, आव्हानात्मक ठरु शकणारी मराठी-क्षमता, मुळातूनच निपटून काढली जाते!

...म्हणूनच कुठल्याच महाराष्ट्रातल्या आंदोलनाला, आता पूर्वीची 'जान' राहिलेली नाही. प्रबोधनकार ठाकरे गेले, पण त्याचबरोबर खरी जाज्वल्य 'ठाकरी-प्रबोधना'ची महान परंपरा कायमची लयाला गेली... आणि, महाराष्ट्राची अधोगती घडवणाऱ्या फाजिल-उत्सवप्रियतेला (सार्वजनिक गणेशोत्सव-सत्यनारायण पूजा, दहीहंड्या, गरबे, चैत्रोत्सव-नवरात्रोत्सव, भंडारे इ.) एकच ऊत येऊ लागला!

**विसाव्या शतकाचा अंत जवळपास येत असताना... आपलं बेगडी-ढोंगी 'हिंदुत्वा'चं राजकारण यशस्वी व्हावं म्हणून 'हिंदुधर्म 'विश्वधर्म' होण्याच्या बाता', 'नॉस्त्रादॅमस' या सोळाव्या शतकातील फ्रेंच भविष्यवेत्त्याचा हवाला देऊन उजव्या प्रतिगामी शक्तिंकडून मोठ्याप्रमाणावर पसरवल्या गेल्या होत्या...सध्या, म्हणजे, एकविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात, अचानक 'कल्कि अवतारा'च्या आगमनाच्या पुड्या, याच समाजविघातक शक्तिंकडून आता सोडल्या जात आहेत; जेव्हा, त्यांच्या पापाचे घडे भरल्याने, आम जनता त्यांना सत्ताभ्रष्ट करण्याचा निर्धार करुन बसलीय...जेणेकरुन, जनता अवतारी-संकल्पनेच्या अफुच्या आहारी जाऊन 'त्यांचं आजचं मरण उद्यावर जाईल' आणि न जाणो त्यातूनच, त्यांच्या सुटकेचा वा परागंदा होण्याचा एखादा मार्ग, 'वॉशिंग्टन अथवा तेलअविव'मधून प्रशस्त होत जाईल!**

धन्यवाद....

जय महाराष्ट्र । जय हिंद ।।

***....राजन राजे*** (अध्यक्ष: धर्मराज्य पक्ष)

# 'गुंज' ते नव्या मन्वंतराची चाहूल : राहुल गांधींच्या राजकारणाने काँग्रेसमध्ये आलेले नवे चैतन्य

राहुल गांधींच्या पुण्यातल्या 'छात्रों की गूंज' कार्यक्रमाने काँग्रेसमध्ये एक नव चैतन्य आले आहे. अत्यंत गलितगात्र, पराभूत मानसिकतेत सापडलेली काँग्रेस, गेल्या वर्षभरात राहुल गांधींच्या राजकारणाने ढवळून निघालेली दिसत आहे. राहुलने काँग्रेसला रस्त्यावरची लढाई करण्यास प्रवृत्त केले आहे, हे स्पष्टपणे दिसत आहे.

बरोब्बर १० वर्षांपूर्वी राहुल गांधी यांनी देवनार येथील डम्पिंग ग्राऊंडला भेट दिली होती. मुंबईतल्या सर्वात मोठ्या डम्पिंग ग्राउंडला सतत आगी लागत होत्या. त्या मुद्द्यावर राहुल यांनी मुंबईचा दौरा केला होता. त्या वेळी मोदींच्या स्वच्छ भारत योजनेचा प्रचंड गवगवा झाला होता. स्मार्ट-सिटी वगैरे लांब्याचवड्या घोषणांचा तो सुकाळ होता. त्या सुरुवातीच्या काळात राहुल गांधी देवनारच्या डम्पिंग ग्राउंडवर पोहोचले. तेथील लोकांच्या गाठीभेटी घेतल्या. या भागात मोठ्या प्रमाणावर प्रदूषण आहे. मुलांना क्षयरोग होत आहे. यात एका मुलाचा मृत्यूही झाल्याचे ते सांगत होते. मुंबई ही भारताची आणि प्रगतीची ओळख आहे आणि अशा शहरात असा कचरा डेपो असता कामा नये, असे ते म्हणाले होते.

त्या डम्पिंग ग्राउंडमध्ये कचऱ्याच्या ढिगाऱ्यावर राहुल गांधी चढून गेले होते आणि त्यांच्या मागे टाटा सफारी, टोयोटा कोरोला, मर्सिडिजमधून घाम पुसत काँग्रेस नेते पळापळ करत होते. तो फोटो त्यावेळी माध्यमांमध्ये गाजला होता. राहुल गांधी यांनी तेव्हाच काँग्रेसला रस्त्यावर उतरण्यास सांगितलं होतं. पण सुस्त काँग्रेस नेते रस्त्यावरच्या लढाईत फारसे उत्सुक नव्हते. पुढचा, या दशकातला काँग्रेस नेत्यांचा इतिहास सर्वज्ञात आहे. काँग्रेसच्या अनेक नेत्यांनी भाजपशी दोन हात करण्यापेक्षा त्यांच्या गोटात जाऊन आपले गड, जहागिऱ्या वाचवले. आजही अनेक नेत्यांचे तेच प्रयत्न सुरू आहेत.

असे पक्षातले अंतर्विरोध असूनही पुण्यातील 'छात्रों की गूंज' कार्यक्रमातून राहुल यांनी महाराष्ट्र काँग्रेसमध्ये चैतन्य आणण्याचं काम केलं आहे. सुस्त नेत्यांना त्यांनी कोणते प्रश्न आपण हाती घेतले पाहिजेत, हे सांगण्याचा प्रयत्न केला आहे. सत्ताधाऱ्यांवर केवळ राजकीय टीका म्हणजे राजकारण नव्हे; तर, बदलत्या समाजाच्या आकांक्षा, त्यांचे प्रश्न हाती घेऊन त्याची उत्तरे सतत मागणे हे राजकारण असल्याचं त्यांनी सांगितलं. हा अत्यंत प्रगल्भ राजकीय विचार त्यांनी काँग्रेसला दिला आहे. त्याची देशाच्या राजकारणाला या घडीला गरज आहे.

आज राजकारणाचे विषय हे वाढते नागरीकरण, झोपडपट्ट्या, वाहतुकीची कोंडी, रस्त्यावरचे खड्डे, उत्तम रस्ते, पाणी, चालायला फूटपाथ, मुलांना खेळायला बागबगिचे, मैदाने, क्रीडांगणे, वृद्धांसाठी आरोग्य योजना, चांगली शिक्षण व्यवस्था, पर्यावरण, रोजगार, शेती समस्या इ. इ. असायला हवेत. ते न होता राष्ट्रवाद, हिंदू-मुस्लिम, पाकिस्तान-बांगलादेश, हिंदुत्व, चिनी वस्तूंवरील बहिष्कार असे देशाला खाईत घेऊन जाणारे विषय होताना दिसतात आणि देशातील विरोधी पक्षांना हे विषय हाती घेता येत नाहीत, ही दुर्दैवाची परिस्थिती आहे.




म. गांधींनी ब्रिटिशांशी लढताना सविनय कायदेभंग वापरला; पण, त्यांनी काँग्रेस पक्षाला लोकांपर्यंत पोहोचण्याचा समांतर असा रचनात्मक कार्यक्रमही दिला. कायदेमंडळात ब्रिटिशांशी वेगळ्या भूमिकेतून लढणे आणि समाजाचे प्रश्न सोडवताना समाजाचा एक भाग होऊन तो प्रश्न सोडवणे, असे गांधींचे राजकारण असे. राहुल गांधी हे त्याच दिशेने जात आहेत. पहिले भारत जोडो यात्रेतून त्यांनी देशात पसरलेल्या विखाराला प्रेमाचे उत्तर दिले. त्यावेळीही त्यांनी त्यांच्या मागे पक्षातील किती नेते, कार्यकर्ते आहेत, कोणता जनसमूह आहे याची पर्वा केली नाही. ते चालत राहिले, लोक जोडत गेले व समाजात एक वेगळी सिम्पथी निर्माण होत गेली. त्यांची ही संपूर्ण यात्रा बिगर राजकीय स्वरूपाची होती.

अस्वस्थ, असंतोषग्रस्त असलेल्या समाजात स्थैर्य आणणे व त्याला प्रगतीची दिशा दाखवणे, समाजातील दोषावर काम करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास रुजवणे, शोषित-दुर्बल घटकांमध्ये सतत काम करून त्यांना राजकीय प्रवाहात आणण्याचे काम करणे हे लोकशाही, सेक्युलर, मानवतावादी मूल्य स्वीकारलेल्या राजकीय नेत्याने करायचे असते. तो रोल आज राहुल गांधी करताना दिसत आहेत.

गेली १०-१२ वर्षे ही प्रचंड मन्वंतराची होती. देश हिंदुत्वाच्या लाटेवर आरूढ होऊन हिंदू राष्ट्र होतो की, काय अशी भीती वाटत असताना अचानक अभिजीत दीपके, नेहा बोरा, सौरभ दास यांच्या जेन-झी आंदोलनाने 'मोदीशा' यांच्या फॅसिस्ट राजकारणाला मोठे भगदाड पाडले. १६-१७ वर्षांची पोरं-पोरी थेट पंतप्रधान-गृहमंत्र्याला प्रश्न विचारू लागली, पोलिसांच्या दमनशाहीला त्यांनी विनोदातून चिमटे काढले व त्यांच्या कॉन्शन्सलाच त्यांनी आव्हान दिले, हे विलक्षण होते. ही लाट नाही, तर ते नवे मन्वंतर आहे. जंतर मंतरनंतरची राहुल गांधींची पुण्यातील ही 'गुंज' ही अत्यंत महत्त्वाची आहे. त्यातून देशात अद्भुत बदल होऊ शकतो.

*- सुजय शास्त्री*

राहुल गांधींच्या पुण्यातील 'छात्रों की गुंज' कार्यक्रमाकडे केवळ एका राजकीय सभेच्या रूपात न पाहता काँग्रेसमध्ये नव्या राजकीय ऊर्जेची शक्यता म्हणून पाहता येईल. सत्तेवर टीका करण्यापेक्षा शिक्षण, रोजगार, नागरी सुविधा, पर्यावरण, वाहतूक, पाणी, आरोग्य आणि सामाजिक न्याय यांसारखे लोकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेले प्रश्न राजकारणाच्या केंद्रस्थानी आणण्याचा त्यांचा प्रयत्न महत्त्वाचा आहे.

मात्र, याच ठिकाणी काँग्रेससमोरील सर्वात मोठा विरोधाभास उभा राहतो. राहुल गांधी दिल्लीला गेल्यानंतर स्थानिक पक्ष संघटना पुन्हा शांत होत असेल, तर जनआंदोलन उभे कसे राहणार? नेता रस्त्यावर उतरतो आणि त्याच्या अनुपस्थितीत प्रदेश, जिल्हा व स्थानिक पातळीवरील संघटना निष्क्रिय राहतात, तर त्यातून आंदोलन नव्हे, तर केवळ नेतृत्वकेंद्रित राजकारण निर्माण होते.

राहुल गांधींनी प्रश्न ओळखणे आणि दिशा देणे महत्त्वाचे आहे; पण त्या प्रश्नांना सातत्याने रस्त्यावर नेणे, लोकांमध्ये काम करणे, स्थानिक नेतृत्व तयार करणे आणि आंदोलन उभे करणे ही काँग्रेस संघटनेची जबाबदारी आहे.

भारत जोडो यात्रेने निर्माण केलेली सहानुभूती किंवा पुण्यातील तरुणांची ऊर्जा जर संघटनात्मक कृतीत रूपांतरित झाली नाही, तर ती पुन्हा विखुरेल. त्यामुळे आज राहुल गांधींपेक्षा अधिक महत्त्वाचा प्रश्न काँग्रेस संघटनेसमोर आहे-राहुल गांधींनी दाखवलेल्या दिशेने पक्ष स्वतः चालणार कधी?

**- घनश्याम सोनार**

(समाजमाध्यमातून साभार....)

# ‘जातिभेदाच्या भिंती मोडणारा कर्मवीरांचा मायेचा स्पर्श’

भाऊराव जातीने जरी जैन होते, तरी त्यांच्या वसतिगृहांत जैन विद्यार्थी फार थोडे असत. विशेष भरणा मराठे, कुणबी यांचाच होता. त्यांच्या खालोखाल महार, मांग, चांभार असत. वसतिगृहांतील स्वयंपाक-पाण्याची व्यवस्था जातिनिरपेक्षपणे विद्यार्थी स्वतः करीत. त्यांत मराठे, महार, चांभार, मुसलमान असा भेदभाव न करता स्वयंपाक-पाणी सर्व जण आळीपाळीने करीत, असे मी त्यांच्या वसतिगृहाच्या अहवालांत वाचले होते; म्हणून मी एकदा भाऊरावांना म्हणालो, **‘भाऊराव, अहवालांत लिहिलेली ही माहिती कितपत खरी आहे, हे सांगाल काय?’ ते म्हणाले, ‘पाटीलसाहेब, आपण स्वतःच येऊन पाहा ना.’ मी म्हणालो, ‘जरूर येईन; पण माझी येण्याची तारीख मी आगाऊ सांगणार नाही.’ भाऊराव म्हणाले, ‘काही हरकत नाही, पण आपल्या भेटीच्या वेळी मी हजर असावे, अशी आपली इच्छा असल्यास तो भेटीचा आठवडा तरी सांगितलात तर त्या आठवड्यांत मी सातार्‍यांत राहीन.’**

पुढे थोड्याच दिवसांनी मी त्यांना माझा सातार्‍यास जाण्याचा आठवडा पत्राद्वारे कळिवला. पण त्याची माहिती मात्र दुसर्‍या कोणास लागू दिली नाही. ही माझी भेट खासगी स्वरूपाची होती. मी विचार केला की, मुलांच्या संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीच आपण सातार्‍यास पोहोचावे. त्याप्रमाणे मी पुण्याहून संध्याकाळी पाच वाजता निघून सातार्‍यास साडेसात वाजता पोहोचावे असे ठरविले व माझ्या नेहमीच्या पद्धतीप्रमाणे कॅम्प कॉट (घडीची खाट) व बिछाना मोटारींत टाकून सातार्‍यास जाण्याकरिता निघालो. वाटेत थोडासा खोळंबा झाल्याने मी धनणीचे बागेत साडेआठ वाजता पोहोचलो. वसतिगृहांतील विद्यार्थ्यांची जेवणे होऊन आवराआवर चालली होती. काही जण ताटे उचलीत होते, काही शिल्लक राहिलेले अन्न सकाळच्या न्याहारीकरिता झाकून ठेवीत होते व काही जण स्वयंपाकाची भांडी घासत होते. भाऊराव तेथे होतेच.

मला पाहताच ते म्हणाले, ‘जेवणार ना?’ मी सांगितले, ‘होय तर! पण माझी इच्छा तुमच्या विद्यार्थ्यांबरोबरच जेवण्याची होती. वाटेत थोडा खोळंबा झाल्यामुळे ती हुकली. असो.’ भाऊराव म्हणाले, ‘पोरे आता स्वयंपाक करतील. वेळ लागणार नाही.’ मी म्हणालो, ‘तुम्ही माझ्यासाठी काहीतरी चांगले कराल.’ त्यावर ते म्हणाले, ‘रात्रीच्या जेवणापैकी सकाळच्या न्याहारीसाठी मुलांना काही अन्न ठेविले आहे, ते घेता काय?’ मी म्हणालो, ‘छान, तसेच करू.’ तोपर्यंत मी ज्या मुलांनी स्वयंपाक केला व जी मुले ताटे उचलीत होती, त्यांना त्यांची नावे व जाती विचारल्या. सर्व जातींची मुले त्यांत मला आढळली. नंतर भाऊरावांशी बोलत बोलत, मुलांच्या न्याहारीसाठी ठेवलेल्या अन्नांतून भात, आमटी व भाकरी घेऊन मी जेवलो. थोड्या वेळाने सोप्यात नेहमीप्रमाणे ती मुले झोपलीं. भाऊरावहि एका टोकास झोपले. जवळच माझ्या ड्रायव्हरने माझी खाट लावली होती. भाऊरावांच्या उशाशी वात कमी करून एक कंदील ठेविला होता. मुले झोपलीं. भाऊरावहि झोपले, पण मला झोप येईना. खाटेवर नेहमीप्रमाणे मच्छरदाणी होती. मी विचार करीत होतो की, तात्त्विक दृष्ट्या पटूनहि आम्ही व्यवहारांत मात्र महारांमांगांशी शिवाशिव करण्यास बिचकतो आणि या भाऊरावांसारख्या महात्म्याने मराठ्यांची, महारांची व मुसलमानांची मुले एकत्र आणून भावा-भावाप्रमाणे त्यांना वागवयास लाविले, हे केवढे मोठे अलौकिक कार्य! किती अपूर्व ही कामगिरी! मी गेलो ते दिवस थंडीचे होते. सुमारें तीन वाजता भाऊराव उठले. त्यांच्या अंगावर एक मोठा कांबळा होता. त्यांनी हातांत कंदील घेतला व मुले निजलेल्या सोप्याच्या एका टोकापासून दुसर्‍या टोकापर्यंत पाहणी केली. मी मुद्दामच हालचाल केली नाही व गाढ झोपेतच आहे असे त्यांना भासविले. पण मला म झ्या जाळीच्या मच्छरदाणीतून भाऊराव काय करतात हे स्पष्ट दिसत होते. ते मुले पाहत येत असताना, त्यांना एक सात-आठ वर्षांचे मूल थंडीने कुडकुडत असताना दिसले. त्यांनी ते त्याच्या तोकड्या पांघरुणासह उचलून घेतले व त्याला जवळ घेऊन झोपले. सकाळी मी लौकरच उठलो आणि भाऊरावांस हाक मारली व विचारले, ‘भाऊराव, कोणाचे हो पोर तुम्ही रात्री उचलून आणले?’ ते म्हणाले, ‘त्या वेळी तुम्ही जागे होता वाटते? ते एक मांगाचे पोर आहे.’ः

ज्यांनी बहुजन शिकावेत म्हणून रक्ताचं पाणी ज्यांनी केलं वसतिगृहातल्या विद्यार्थ्यांना आईबापासारखं जपलं, वाढवलं, त्या कर्मवीरांना अभिनंदन!

***साभार : ‘माझ्या आठवणी’ (पी. सी. पाटील)***

# ‘राष्ट्रप्रथम’च्या घोषणांआडची आकडेवारी काय सांगते?

मोदी पंतप्रधान झाल्यावर अदानीची नेटवर्थ ४५,००० कोटींवरून ७,८०,००० कोटी झाली. म्हणजे १५३५% वाढ.

भाजपाची घोषित संपत्ती ९७० कोटींवरून ६,०८८ कोटी, म्हणजे ६३०% वाढ.

आणि भारतावरचं कर्ज ५५ लाख कोटींवरून ३३८ लाख कोटी झालं, म्हणजे कर्जामध्ये ४००% वाढ.

आता अजूनही काही आकडेवारी बघा.

ध्निर्यात कमी आणि आयात जास्त, यातल्या गॅपला म्हणतात ट्रेड डेफिसिट.

२०१५ मध्ये ट्रेड डेफिसिट हा जीडीपीच्या तुलनेत ७.११% होता, जो सध्या ८.३४% झाला.

नेट ध्एफडीआय म्हणजे उद्योगधंद्यासाठी परदेशातून येणारी गुंतवणूक वजा देशातून बाहेर जाणारी गुंतवणूक.

२०१५ मध्ये नेट एफडीआय जीडीपीच्या १.५३% होता, जो आता ०.४% वर आलाय.

भारतातून परदेशात जाणारी ध्गुंतवणूक २०१५ मध्ये जीडीपीच्या ४.०३% होती, ती मात्र आता ३३.८४% इतकी वाढली.

पैसे येणं कमी आणि बाहेर जाणं वाढलं. मग भारतातील गुंतवणूक कमी आकर्षक का वाटू लागली?




नेट एफपीआय म्हणजे परदेशातून पोर्टफोलिओमध्ये, शेअर बाजारात आलेली गुंतवणूक वजा देशातून बाहेर गेलेली गुंतवणूक.

२०१५ मध्ये नेट एफपीआय जीडीपीच्या २.०१% होती, जी आता -०.४% झाली, म्हणजे नेगेटिव्ह आहे.

आऊटवर्ड म्हणजे भारताबाहेर जाणारी रक्कम २०१५ मध्ये जीडीपीच्या -०.०१% होती, ती वाढून १.१७% झाली, म्हणजे वाढली.

भारतीय गुंतवणूक कमी आकर्षक किंवा धोकादायक का वाटू लागली?

२०१५ मध्ये डॉलरच्या तुलनेत रुपया ६१.१४ वर होता. ॲन्यूअल ॲव्हरेज एक्स्चेंज रेट -१.०६% होता, तो अंदाजे -४.५% इतका झाला.

म्हणजे रुपया घसरण्याचा वेग वाढला.

आरबीआय सातत्याने लाखो कोटींचा टेकू देऊनही रुपया का घसरतोय?

आज रुपया घसरणे देशहिताचं आहे असं वाटतंय, तर २०१४ पूर्वी ते देशहितविरोधी का वाटत होतं?

आणि ही निवडक काही उदाहरणं. अशी ५६ उदाहरणं देता येतील, ज्यातून दिसतं की जे जे देशहिताचे, त्यात घट झाली आणि जे जे देशासाठी वाईट, त्यात मात्र वाढ झाली.

राष्ट्रप्रथम वगैरे काय म्हणतात, ते हेच का?

***...सुनिता सुकटे***

(सावध राहा बरं, जनतेने तुमचे पैसे कधीच मोजायला घेतलेत.)

# मार्क्सच्या जीवनातील चार महत्त्वाची वर्षं

हजारो वर्षं दाबून धरलेला गरीब कामगार वर्ग सत्ताधारी व्हायला लागला तर? या विचाराने अनेकांची झोप उडाली. सुमारे सत्तर वर्षांनंतर सोव्हिएत युनियन कोसळला आणि श्रीमंत वर्गाने आनंद साजरा केला. मात्र, आजही बऱ्याच प्रमाणात मार्क्सवादाचा प्रभाव आहे. आजही मार्क्सवादावर तसंच मार्क्सच्या जीवनावर कलाकृती सादर होत असतात. अशीच एक कलाकृती म्हणजे The Young Karl Marx हा २०१७ साली आलेला सिनेमा. यात मार्क्सच्या जीवनातील १८४३ ते १८४८ अशी सहा महत्त्वाची वर्षं घेतली आहेत. ती अतिशय महत्त्वाची वर्षं मानली जातात.

**अभ्यासक आधुनिक जगाच्या इतिहासाचे दोन भाग करतात. पहिला भाग म्हणजे मार्क्सपूर्व जग आणि दुसरा भाग म्हणजे मार्क्सनंतरचं जग. एवढा जगावर कार्ल मार्क्स (१८१८१८४३) या जर्मन ज्यू विचारवंताचा प्रभाव होता. त्याच्या विचारांना समोर ठेवून लेनिनने रशियात १९१७ साली कामगारक्रांती केली आणि सोव्हिएत युनियन स्थापन केले. यामुळे युरोपमध्ये आणि जगात इतरत्र खळबळ उडाली. या प्रकारे जर हजारो वर्षं दाबून धरलेला गरीब कामगार वर्ग सत्ताधारी व्हायला लागला तर? या विचाराने अनेकांची झोप उडाली. सुमारे सत्तर वर्षांनंतर सोव्हिएत युनियन कोसळला आणि श्रीमंत वर्गाने आनंद साजरा केला. मात्र आजही बऱ्याच प्रमाणात मार्क्सवादाचा प्रभाव आहे. आजही जगात अनेक ठिकाणी मार्क्सवादाचा गंभीरपणे अभ्यास होत असतो. आजही मार्क्सवादावर तसंच मार्क्सच्या जीवनावर कलाकृती सादर होत असतात.**

अशीच एक कलाकृती म्हणजे The Young Karl Marx हा २०१७ साली आलेला सिनेमा. यात मार्क्सच्या जीवनातील १८४३ ते १८४८ अशी सहा महत्त्वाची वर्षं घेतली आहेत. ही वर्षं तरुण मार्क्सच्या जीवनातील महत्त्वाची वर्षं मानली जातात. सप्टेंबर १८४३ साली म्हणजे वयाच्या २५ व्या वर्षी मार्क्सने On the Jewish Question हा निबंध लिहिला. यामुळे त्याच्याकडे अभ्यासकांचे लक्ष वेधले गेले. या घटनेवर सिनेमा सुरू होतो. सिनेमा संपतो तो २१ फेब्रुवारी १८४८ रोजी प्रकाशित झालेल्या 'कम्युनिस्ट जाहीरनामा'वर. या छोट्या पुस्तिकेने तेव्हा युरोपात खळबळ उडाली होती. या पुस्तिकेचे पहिले वाक्य A spectre is haunting Europe the sectre of communism आणि शेवटचे वाक्य Working Men of All Countries, Unite! मूलभूत क्रांतीचा (वरवरच्या क्रांतीचा नाही) आग्रह धरणाऱ्या तरुण मार्क्सच्या जीवनातील या दोन महत्त्वाच्या घटना आहेत.

मार्क्सच्या चिमुकल्या पुस्तिकेतील पहिले जे वाक्य आहे, A spectre is haunting Europe the spectre of communism समोर ठेवले म्हणजे तेव्हाच्या युरोपातील स्थिती काय होती, हे लक्षात येईल. युरोपातील अनेक देशांत प्रचंड गरीबी होती, कामगारांना कोणतेही अधिकार नव्हते, पगार अपुरे होते. अशा स्थितीत अनेक देशांमध्ये वेगवेगळे नेते आणि संघटना यावर काम करत होत्या. मात्र ते सूचवत असलेले उपाय वरवरचे होते. याच काळात मार्क्सची मैत्री




फ्रेडरिक एंगल्स या समवयस्क, समविचारी पण श्रीमंत तरुणाशी झाली. दोघांचे ध्येय एकच असते आणि ते म्हणजे शोषणरहित समाजाची निर्मिती. सिनेमात हा सुरूवातीचा मैत्रीचा प्रवास, तेव्हाच्या इंग्लंडफ्रान्सजर्मनी वगैरे देशांतील कामगारांची स्थिती व्यवस्थित दाखवली आहे. प्रेक्षकांची सहानुभूती साहजिकच कामगारांकडे जाते.

**त्या काळात युरोपातील महत्त्वाचा विचारवंत म्हणजे फ्रान्समधील पिअर प्रुंधो (१८०९१८६५). हा ज्येष्ठ होता आणि ढोबळ मानाने डाव्या विचारांचा होता. सिनेमात दाखवले तसं सुरूवातीला त्याची आणि मार्क्सची वैचारिक मैत्री होती. नंतर मार्क्सला त्याच्या वैचारिक मांडणीतील कच्चे दुवे जाणवले. दरम्यान १८४६ साली त्यानं Philosophy of Poverty लिहिलं. हा ग्रंथ तेव्हा फार चर्चेत होता. मार्क्सला त्यातील मांडणी अजिबातच मान्य नव्हती. त्याने पुढच्याच वर्षी Poverty of Philosophy हे पुस्तक लिहून प्रुधोंला दमदार प्रत्युत्तर दिलं. हा प्रसंग चित्रपटात फार सरस उतरला आहे.**

या दरम्यान युरोपातील वातावरण आणखीच बिघडत होते. शेवटी मार्क्सला फ्रान्समधून हद्दपार करण्यात आलं. तेव्हा तो नुकताच पिता झाला होता. या चित्रपटात मार्क्सची श्रीमंत घराण्यातून आलेली पत्नी जेनी आणि एंगल्सची कामगार वर्गातून आलेली प्रेयसी आणि नंतरची पत्नी लिझी, ही दोन महत्त्वाची स्त्रीपात्रं आहेत. शिवाय एंगल्सचे श्रीमंत कारखानदार वडील आणि कामगारांची पिळवणूक करून कमावलेल्या संपत्तीवरून एंगल्सचे वडिलांशी झालेले वाद हे कथानकसुद्धा महत्त्वाचे आहे. यातून प्रेक्षकांना मार्क्स तसेच एंगल्स यांची नेमकी भूमिका काय होती, याचा चांगला अंदाज येतो.

सिनेमातील अनेक प्रसंग म्हणजे त्या काळातील युरोपच्या राजकारणाला आणि यथावकाश जगाच्या राजकारणाला कलाटणी देणारे प्रसंग आहेत. सिनेमातील एका महत्त्वाच्या प्रसंगात मार्क्स आणि एंगल्स डाव्या विचारांच्या कार्यकर्त्यांच्या एका मिटींगमध्ये सहभागी होतात. तेव्हा त्यांना जाणवते की हे कार्यकर्ते, त्यांचे नेते लढाऊ आहेत. पण या कार्यकर्त्यांच्या आणि त्यांच्या नेत्यांच्या विचारांना पुरोगामी विचारांचा भक्कम पाया नाही. म्हणून मग दोघे बसून सोप्या भाषेत एक पुस्तिका लिहितात ज्याचं नाव आहे 'कम्युनिस्ट जाहीरनामा'. ही पुस्तिका सुरूवातीला जरी जर्मन भाषेत लिहिली होती तरी नंतर या पुस्तिकेचे जगातील सर्व प्रमुख भाषांत भाषांतर झाले. ही पुस्तिका १९३१ साली मराठीत उपलब्ध झाली. या पुस्तिकेच्या लेखनात मार्क्सएंगल्सच्या जोडीने जेनी आणि एंगल्सची पत्नी लिझी यांचा मोठा वाटा होता. या पुस्तिकेचे वाचन अनेक पातळ्यांवरील लोक करतानाच्या दृश्यांवर हा सिनेमा संपतो. हा सिनेमा २०१७ साली बनवला असल्यामुळे शेवटच्या प्रातिनिधीक दृश्यांत नेल्सन मंडेला, चे गव्हेरा, जॉन केनेडीक्रुश्चेव्ह वगैरे त्याकाळचे सर्व महत्त्वाचे नेते दाखवले आहेत. या दरम्यान पार्श्वभूमीत बॉब डायलनने १९६५ साली गायलेले आणि नंतर अतिशय लोकप्रिय झालेलं गाणं Like a rolling stone वापरलं आहे. हे गाणं म्हणजे त्याकाळी बंडखोरांचं गाणं होतं. यात घर नसल्यांची, अन्न न मिळालेल्यांची व्यथा मांडली होती.

या गाण्याने पारंपरिक गाण्यांचे अनेक नियम मोडले होते. उदाहरणार्थ त्याकाळी गाणी तीन मिनिटांची असायची. बॉबचं हे गाणं तब्बल सहा मिनिटांचं आहे. मार्क्ससारख्या आद्य बंडखोराच्या जीवनावरील चित्रपट बॉबच्या गाण्यावर संपावा, यात एक प्रकारची कलात्मक अपरिहार्यता आहे. मार्क्सचे एकूण आयुष्य ६५ वर्षांचं. त्यातील फक्त सहा वर्षं घेऊन दर्जेदार आणि खिळवून ठेवणारा चित्रपट काढणं सोपं नाही. त्यातही हा चित्रपट एकविसाव्या शतकात काढायचा म्हणजे एकोणिसाव्या शतकातील वातावरण, सायकली, कपडे, घरातील फर्निचर, नेपथ्य वगैरे सर्व उभं करावं लागलं. पाश्चात्य चित्रपट बघताना तो काळ उभा करण्यासाठी त्यांनी घेतलेली मेहनत सतत जाणवत राहाते. सिनेमाचे दिग्दर्शन राऊल पेक यांचे आहे. त्यांच्या दिग्दर्शन कौशल्याला दाद द्यावी लागते. हा चित्रपट रसिकांना खिळवून ठेवतो. मला नेहमी पाश्चात्य सिनेमांतील नटनटांच्या निवडींबद्दल फार कौतुक वाटतं. या सिनेमातील मार्क्सची भूमिका करणारा ऑगस्ट डिएल, एंगल्सची भूमिका करणारा स्टीफन कोनार्स्के, मार्क्सची पत्नी जेनीच्या भूमिकेतील विकी क्रिप्स आणि एंगल्सच्या पत्नीच्या भूमिकेतील हॅना स्टिल यांनी अतिशय समरसून भूमिका सादर केल्या आहेत. यापुढे मला जर कोणी विचारलं की तरुणपणी मार्क्स कसा दिसत होता तर मी चटकन सांगेन या चित्रपटातील ऑगस्ट डिएलसारखा. असेच विधान स्टीफन कोनार्स्के (एंगल्स) व दोन महिला नट्यांना लागू होते. या चारही महत्त्वाच्या पात्रांनी एवढा जिवंत अभिनय सादर केला आहे की विचारता सोय नाही. आवर्जून बघावा असा चरित्रपट!

***- प्रा. डॉ. अविनाश कोल्हे***

...(सौजन्य : आपलं महानगर)

# कृष्ण, हा परिपूर्ण 'अवतार' की, सर्व वर्णांचा भ्रतार अन् विश्वव्यापी मानवधर्माचा प्रसार...???

ज्याच्या जन्माआधी, जन्मापासून आणि पुढे संपूर्ण बाल्यावस्थेत...त्याचा अंत घडवण्यासाठी शत्रूपक्ष दबा धरुन बसलेला असावा...**शिशुपाल, दुर्योधन, दु:शासन, कंस, पौंड्रक आदी त्याला अवचित गाठून अवमानित करण्याची एकही संधि सोडीत नसावेत; तरीही, ज्याच्या बासरीवर जीवनसंगीताचे अलौकिक सूर छेडले जात रहावेत...सर्वांना आपल्या अनुपम प्रेमरसात न्हाऊमाखू घालीत, अवघा भवताल ज्याच्या प्रेमरसात आकण्ठ बुडून जात रहावा...सान्निध्यात येणाऱ्या हरेक जीवमात्राच्या अंतरी, ज्याच्या परीसस्पर्शाने 'नादब्रह्म' फुलत जावा....**

...असा तो कृष्ण म्हणजे, ''जीवापाड जपावं असं मैत्र अन् बलाढ्य शत्रू समोरील अजेय गोत्र!''

तो म्हणजे आसमंत दुमदुमवून टाकणारा, भयशंकित करणारा 'पांचजन्य शंख'...तो म्हणजे बासरीने प्रसवलेला नाजूकसाजूक 'आहत नाद' अन् तो म्हणजे व्योम व्यापून उरणारा 'अनाहत नाद'!

तो म्हणजे हृदयाच्या अंतर्हदयाला भिडणारं प्रेमसंगीत अन् तो म्हणजे शत्रू-हृदयाला भिवविणारं संगीत रौद्रभीषण!

तो म्हणजे अमन शांति-सलोखा राखू पहाणारा बुद्ध, तो म्हणजे दुर्जनांचा प्रचंड संहार घडवू पहाणारं अटळ युद्ध!

तो म्हणजे मुकूट वा सिंहासन नसलेला, अनभिषिक्त पृथ्वीसम्राट...तो म्हणजे अर्जुनाच्या रथाचं सारथ्य अन् अर्जुनाच्या जीवनाचा अन्वयार्थ!

तो म्हणजे ''न धरी शस्त्र करी मी'' म्हणणारा अन् निर्वाणीच्या क्षणी पितामह भीष्मांवर सुदर्शन-चक्र चालवू पहाणारा!

तो म्हणजे अवघ्या गोकुळाला वेड लावून मथुरेची वाट धरणारा अन् कुरुक्षेत्रावर अखिल मानवतेला गीतेचा जीवनसंदेश देणारा!

तो म्हणजे सदैव सत्याची कास धरणारा; तरीही, समष्टीच्या कल्याणार्थ प्रसंगोपात्त, असत्याचा सरळसोट आधार घेणारा अन् सत्याला नव्याने 'परिभाषित' करणारा!

तो म्हणजे, **''चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः'' असं म्हणत...स्वत:, चारही आश्रमांमधून मुक्त संचार करणारा अन् ''जन्माधारित नव्हे, तर कर्मगुणाधारित'' समाजव्यवस्थेच्या घुसळणीतून सौख्य व अक्षय आनंदाचं 'नवनीत', समस्त मानवतेच्या हाती देणारा!**

गीतेचा अमोघ शास्त्रार्थ करताना 'ब्राह्मण्य', सुदर्शनचक्र प्रयोजनासमयी 'क्षत्रियत्व', मथुरेद्वारी दुग्धोत्पन्न-पदार्थांच्या व्यापाराप्रसंगी 'वैश्यत्व' आणि अश्वपालन-रथसंचालनात 'शूद्रत्व'...तो अंगी लिलया बाणवताना दिसतो; त्यातूनच, ''जन्माला येणारा प्रत्येक मानवी जीव, हा मूलतः 'शूद्र'च असतो; पण, स्वत:च्या आंतरिक गुणांनी व बाह्य कर्मांनी, तो आपापला 'समाजधर्म' ठरवत जातो'', अशी पांचजन्य फुंकत उद्घोषणा करताना कृष्ण, आंतरिक गुणांचं प्राबल्य अधोरेखित करतो.

''प्रत्येकाला आपापल्या इच्छेनुसार, क्षमतेनुसार कुठलाही 'समाजधर्म' निवडण्याचं मुक्त स्वातंत्र्य, ठामपणे अधोरेखित करतानाच कृष्ण, ''आपल्या कारकिर्दीच्या अखेरीस, अखिल मानवतेच्या हितासाठी...चारही वर्णांतून 'उलट प्रवास' करत, अर्जुनाच्या रथ-सारथ्याचं 'शूद्रत्व' स्विकारताना दिसतो!''

...याचाच अर्थ, **''वर्णश्रेष्ठत्वाचा अभिनिवेश व त्यातून दुसऱ्या 'वर्णा'विषयी वा 'समाजधर्मा'विषयी निर्माण होणारी तुच्छतेची भावना''; या दोन्ही बाबी कृष्ण, केवळ त्याज्यच ठरवत नाही, तर तो त्यांना 'प्रज्ञापराध' ठरवतो...आणि, सर्व वर्णांमध्ये एकात्मिक व अतूट असा 'जैव-बंध', स्वत:च्या जीवन-परिक्रमेतून निर्माण करतो...एक असा 'जैव-बंध', जो समाजधारणेसाठीच केवळ व्युत्पन्न झालेला असतो; 'समाज-विभाजना'साठी नव्हे!**

***...राजन राजे***
(अध्यक्ष : धर्मराज्य पक्ष)



## कृष्ण कुठे दिसलाच नाही

पुढारी दिसले, कार्यकर्ते दिसले, पण...
कृष्ण कुठे दिसलाच नाही
पोलिस दिसले, नेते दिसले, पण
कृष्ण कुठे दिसलाच नाही
स्टेज दिसले, डिजे दिसले पण
कृष्ण कुठे दिसलाच नाही
गर्दी होती, दर्दी दिसले, पण
कृष्ण कुठे दिसलाच नाही
हंड्या होत्या, थर दिसले, पण
कृष्ण कुठे दिसलाच नाही
सभ्य भेटले, दारुडे पण दिसले, पण
कृष्ण कुठे दिसलाच नाही
फ्लेक्स होते, बॅनर दिसले, पण
कृष्ण कुठे दिसलाच नाही...
देखावे होते, झगमगाट दिसला, पण...
कृष्ण कुठे दिसलाच नाही...
भपका होता, उधळण दिसली, पण...
कृष्ण कुठे दिसलाच नाही...
गॉगल होते, टीशर्ट दिसले, पण...
कृष्ण कुठे दिसलाच नाही...
पोरं होती, पोरीही उतरल्या, पण...
कृष्ण कुठे दिसलाच नाही...
कॅमेरा होते, माईकवाले दिसले, पण...
कृष्ण कुठे दिसलाच नाही...
मग अचानक लक्षात आलं की, का...
कृष्ण कुठे दिसलाच नाही...

टीव्हीवर दिसला संजू बाबा, तोच अतिरेक्यांची हत्यार बाळगून तुरुंगात जाऊन आलेला, तो पण कृष्णाच्या वाढदिवसाला आला होता, पण कृष्ण स्वतःच तिथे नव्हता...

मग दिसली सब से कातील, नितंब हलवत, बेंबी दाखवत नाचणारी.. नाचताना इशारे करत, बाळ गोपाळांना पेटवणारी, ती एकदम झोकात होती पण कृष्ण तिथेही नव्हता...

ह्या सगळ्या गोंगाटात आणि संपणाऱ्या संस्कृतीत उरलेली एक आजी होती... नऊवारी नेसलेली, देव्हाऱ्यासमोर उभी असलेली, हाताने वळलेल्या वातीचा दिवा लावून, बाळकृष्णाला पाळणा म्हणणारी, स्वत: दही घुसळून काढलेलं शुभ्र लोणी, छोट्याश्या वाटीत नैवेद्याला ठेऊन थरथरते हात जोडणारी.

तिच्या निरंजनाच्या प्रकाशात तो देव्हाऱ्यात उभा होता, आजीचा तेज:पुंज कान्हा..तिच्या भक्तीला साद देत बासरी वाजवत होता....दिवसभर कृष्ण तिथून हललाच नाही...

बाकी सर्वत्र भपका, गोंगाट, ढासळती संस्कृती आणि अमाप खर्च होता, पण...
कृष्ण कुठे दिसलाच नाही...

***...मंदार जोग***

Printed, Published and Owned by **Rajan Raghunath Raje Printed** at, **Siddhakala Print Media and Publications Pvt. Ltd.**, Plot No. W 230, T.T.C. Industrial Area, Khairne, Navi Mumbai, Dist -Thane, Pin Code -400710 and Published from Shubharambha, Phase - 1 Building No. 7, Room No. 601 - 602, Kokani Pada Marg, Off. Ghodbunder Road, Manpada, Thane [West], Apna Bazar S.O, Dist - Thane, Pin Code - 400610, Maharashtra. Editor : **Maheshsingh Narayansingh Thakur (97695 25006)** (RNI: MAHMAR/2023/88105)

कार्यालयीन पत्ता : तळमजला, रविदर्शन बिल्डिंग, डॉ. बेडेकर हॉस्पिटलजवळ, राममारुती क्रॉस रोड, डीएनएस बँकेच्या मागे, नौपाडा, ठाणे (प.) ४००६०२. संपर्क क्र. ७७७७०६९५३०